Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २०० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ८ सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पहिल्यांदाच होणार डिजिटल जनगणना

### देशभरातील जवळपास ३४ लाख कर्मचाऱ्यांची या कामासाठी नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नवी दिल्ली**

करोनामुळे २०२१ साली होऊ न शकलेली जनगणना आता होऊ घातली आहे. यासंदर्भातील पहिल्या टप्प्याचं काम सुरू झालं आहे. यावेळची जनगणना ही काही बाबतींत वेगळी ठरली आहे. कारण यावेळी गोळा केल्या जाणाऱ्या माहितीमध्ये जातीसंदर्भातील माहितीचाही समावेश करण्यात आला आहे. त्याशिवाय, पहिल्यांदाच ही माहिती गोळा करण्यासाठी डिजिटल माध्यमांचा वापर होणार आहे. २०२६-२७ या काळात दोन टप्प्यांमध्ये जनगणनेची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. त्यासाठी देशभरातील जवळपास ३४ लाख कर्मचाऱ्यांची या कामासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

**देशातली पहिली डिजिटल जनगणना**

यंदा होणारी जनगणना ही देशातली पहिली डिजिटल जनगणना ठरली आहे. रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया अर्थात जनगणनेची जबाबदारी असणाऱ्या ठऋख ने प्रत्यक्ष लोकांची माहिती गोळा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्याच मोबाईल फोनवर जनगणनेची माहिती गोळा करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यानंतर मोबाईलमधील हा डेटा केंद्रीय सर्व्हरवर ट्रान्सफर केला जाईल. कर्मचाऱ्यांच्या मोबाईलमध्ये खास



जनगणनेसाठी तयार करण्यात आलेलं ॲप डाऊनलोड करून दिलं जाईल. या ॲपवर इंग्रजीसह प्रादेशिक भाषांमध्येही माहिती जमा करता येणार आहे. अँड्रॉइड व आयओएस अशा दोन्ही प्रणालींवर हे ॲप वापरता येईल. इंडियन एक्स्प्रेसनं यासंदर्भातील सविस्तर वृत्त दिलं आहे. त्यानुसार, जर काही कारणास्तव माहिती गोळा करणाऱ्या कर्मचाऱ्याने मोबाईल ॲपवर माहिती न घेता कागदावर नोंदी करून घेतल्या, तर नंतर त्यांना ती सगळी माहिती यासंदर्भातील विशिष्ट अशा वेबसाईटवर अपलोड करावी लागेल. या पद्धतीमुळे आधीप्रमाणे गोळा केलेली माहिती पुन्हा एकदा स्कॅन करणे, ऑनलाईन भरणे या गोष्टी टाळता येणार आहेत. त्यामुळे पहिल्यांदाच प्रत्यक्ष माहिती घेण्याचं काम डिजिटल पद्धतीने केलं जाणार आहे.

**दोन टप्प्यांत होणार जनगणनेचं काम**

दरम्यान, जनगणनेचं काम दोन टप्प्यांत केलं जाणार आहे. पहिल्या टप्प्यात एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या काळात घरांबाबतची माहिती गोळा केली जाईल. त्यात घराची अवस्था, घरातील सोयी-सुविधा आणि प्रत्येक घरानिशी असणारी मालमत्ता याबाबतच्या माहितीचा समावेश आहे. दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ पासून सुरू होणार असून त्यात प्रत्यक्ष व्यक्तींची माहिती गोळा केली जाईल. लडाख, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश व उत्तराखंड ही राज्ये वगळता इतर ठिकाणी याच पद्धतीने जनगणना होईल. या राज्यांमध्ये सप्टेंबर २०२६ मध्ये जनगणनेचं काम केलं जाईल.

**प्रत्येक इमारतीचं जिओ-टॅगिंग!**

डिजिटल माहिती आणि स्वयंगणनेसोबतच यंदा जनगणनेदरम्यान ऋक्षे ढससळपस च्या सुविधेचा वापर केला जाणार आहे. त्यानुसार प्रत्येक इमारतीला जिओ टॅग केलं जाणार आहे. यासाठी डिजिटल लेआऊट मॅपिंग आणि हाऊसलिस्टिंग ब्लॉक्स यांची मदत घेतली जाईल.

## दीक्षाभूमीवर यंदा लाखो अनुयायांचे होणार हाल

### धम्मचक्र प्रवर्तन दिनाची अद्याप तयारी नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नागपूर**

धम्मचक्र प्रवर्तन दिन २५ दिवसांवर आला आहे. परंतु, अजूनही दीक्षाभूमीवर कुठलीही तयारी सुरू झालेली नाही. याबाबत अनेक सामाजिक संघटनांनी शासन व प्रशासनाला पत्रसुद्धा लिहिले आहे. दीक्षाभूमी स्मारक समितीतील अंतर्गत वाद सुरू असतानाच, सोयीसुविधांसाठी प्रशासनाच्या आडमुठी धोरणामुळे संघटना चिंतित आहेत. एकूणच यंदा दीक्षाभूमीवर येणाऱ्या लाखो अनुयायांचे हाल होण्याची भीती वर्तविली जात आहे.

यावर्षी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन चळवळीच्या पार्श्वभूमीवर दीक्षाभूमीवर प्रचंड जनसमुदाय उपस्थित राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, दिवस कमी आहेत मात्र तयारी सुरू झालेली नाही. परिणामी गैरसोय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याच पार्श्वभूमीवर तयारीसंदर्भात स्मारक समितीला जाब विचारण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक व विविध सामजिक व धार्मिक संघटनांची बैठक दीक्षाभूमीवर पार पडली. पद्माकर गणवीर हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी स्मारक समितीचे सदस्य डॉ. सुधीर फुलझेले हेसुद्धा उपस्थित झाले होते. त्यांनी तयारीसंदर्भात स्मारक समितीची बैठक होणार असून धम्मचक्र प्रवर्तन दिनाची तयारी पूर्ण करण्याची हमी दिली. या बैठकीला भारतीय बौद्ध महासभेचे महानगर अध्यक्ष जे. आर. गोडबोले, विलास उंदीरवाडे, राज्य संघटक भीमराव फुसे, कास्ट्राइबचे अध्यक्ष अरुण गाडे यांच्यासह विविध संघटनांचे महिला-पुरुष पदाधिकारी व बौद्ध बांधव उपस्थित होते.

## समृद्धी महामार्गावर अडीच कोटींची वॅक्सीन चोरी

### आंतरराज्य टोळीला वाशिम पोलिसांनी केली अटक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८वाशिम**

समृद्धी महामार्गावर चालत्या कंटेनर मधून तब्बल २ कोटी ४३ लाखांच्या वॅक्सीनची रॉबरी केल्याची घटना समोर आली. ही चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला वाशिमपोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून ३८ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. चोरी गेलेल्या वॅक्सीनचा मात्र अजूनही शोध घेतला जात आहे. या गुन्ह्यात पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली आहे.


भिवंडी येथून नागपूर मार्गे कोलकत्ता येथे डिलिव्हरीसाठी निघालेल्या कंटेनर (चक ०४गघ७०५४) मधील ४६ बॉक्स औषधं अज्ञात चोरट्यांनी २३ जुलै रोजी चालत्या गाडीतून लॉक कापून चोरली होती. या संदर्भात कंपनीने तक्रार दिल्यानंतर कारंजा ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, सायबर सेल आणि कारंजा ग्रामीण पोलीस यांनी संयुक्त तपास सुरू करत. तब्बल ८५ हजार वाहनांची तपासणी करून पोलिसांनी संशयित ट्रक शोधून काढला. त्यानंतर हे आरोपी गोवा येथे अशाच प्रकारच्या दुसऱ्या रॉबरी साठी जात असताना वाशिमच्या कारंजा परिसरात पोलिसांनी धाडसी कारवाई करून चार आरोपींना अटक केली तर त्यांनी दिलेल्या माहितीनुसार पुढे मध्य प्रदेशातील देवास येथे मुख्य सूत्रधार राजेंद्र चौहान आणि त्याचा साथीदार भारत घुडावद यांना अटक करण्यात आली. हे सर्व आरोपी मध्य प्रदेशातील राहणारे आहेत.कारवाईदरम्यान इलेक्ट्रॉनिक कटर, ट्रक व स्कॉर्पिओसह ३८.२० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींनी महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक व गुजरातमध्ये अशा प्रकारच्या चोरी केल्याचं कबूल केलं आहे. त्यांच्यावर विविध पोलीस ठाण्यात असेच ११ गुन्हे दाखल असून पुणे पोलिसांनी मोक्का अंतर्गत देखील यांच्यावर कारवाई केली होती. सध्या सर्व आरोपींना १२ सप्टेंबरपर्यंत पोलीस कस्टडी मिळाली असून पुढील तपास सुरू आहे.

## विरोधकांच्या ठिकऱ्या उडणार, बाळासाहेबांच्या विचारांशी गद्दारी करणाऱ्यांनी...भाजपाचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मुंबई**

उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा विजय होईल असा आम्हाला विश्वास आहे. या निवडणुकीत 'युपीए'च्या ठिकऱ्या उडणार आहेत. युपीएतील खासदारसुद्धा आता राहुल गांधींच्या अपरिपक्व राजकारणाला कंटाळले असून क्रॉस व्होटिंगचा युपीएला धोका आहे. सर्वाधिक सावध राहण्याची गरज युपीए आणि राहुल गांधी यांना आहे. त्यामुळे संजय राऊत यांनी राहुल गांधी यांना सावधगिरीचा सल्ला द्यावा, अशी खोचक टीका भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी सोमवारी केली. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी गद्दारी करणाऱ्या उद्धव ठाकरे, संजय राऊतांनीभाजपाला शहाणपण शिकवू नये, असेही ते म्हणाले.

भारतीय जनता पार्टीने यावेळी मुहूर्त न काढता उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक पितृपक्षात घेतल्यामुळे भाजपा हा सेक्युलर झाला असे संजय राऊत म्हणालेत. भाजपासाठी ३६५ दिवस पवित्र



असल्याने आम्हाला निवडणुकीचा मुहूर्त काढावा लागत नाही. पितृपक्ष असल्याने निवडणूक घेऊ नये, हा संजय राऊत यांचा केवळ बहाणा आहे. खरं म्हणजे ते घाबरले असून निवडणुकीपासून पळ काढत आहेत, असे ते म्हणाले.

**राऊतांना गणेशोत्सवापेक्षा अफजलखानाची कबर जास्त प्रिय!**

मुंबई महापालिका निवडणुकीत मविआचा नव्हे तर महायुतीचा महापौर होणार आहे. संजय राऊत यांनी दिवसा स्वप्न पाहणं थांबवावे. आज खरी शिवसेना भाजपासोबत आहे. आगामी महापालिका निवडणुकाही आम्ही मराठी माणसाच्या आणि सर्वसामान्यांच्या ताकदीवर जिंकणार आहोत. गणेशोत्सव हा हिंदूंचा आहे. लालबागचा राजा राऊत यांना पावणार नाही, कारण राऊतांना गणेशोत्सवापेक्षा अफजलखानाची कबर जास्त प्रिय वाटते. संपूर्ण महाराष्ट्र आनंदाने गणेशोत्सव साजरा करतो पण तुम्हाला नेमके तेच खुपते. गणेशोत्सवाला जात नाही असं कितीही राऊत यांनी सांगितलं तरी महाराष्ट्राचा प्रत्येक नागरिक तो मोठ्या उत्साहात साजरा करतो, असा भाजपाने घणाघात केला.

**भाजपाचा बाप काढणाऱ्यांनी बाळासाहेबांच्या विचारांशी गद्दारी केली !**

देवाभाऊ' यांच्या जाहिरातीवर टीका करताना राऊत भाजपाचा बाप काढत आहेत. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी उद्धव ठाकरे, संजय राऊतांनी गद्दारी केली. बाळासाहेबांचे शेवटच्या दिवसांत कसे हाल केले गेले, याबाबत खुद्द राज ठाकरे यांनीच सांगितलं आहे. ज्यांनी आपल्या वडिलांना अशी वागणूक दिली, ज्यांना त्यांचे कार्यकर्ते सोडून गेले, त्यांना दुसऱ्याचा बाप काढण्याचा अधिकार नाही, असा टोला भाजपाने लगावला.

## भरती-ओहोटीत रेंगाळला लालबागचा राजा, ३६ तासांनी विसर्जन

### राजाला निरोप देण्यासाठी भाविकांचे प्राण कंठाशी


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मुंबई**

मुंबईतील प्रसिद्ध लालबागचा राजाच्या विसर्जनात यंदा प्रथमच अडथळे आले. अनंत चतुदर्शीच्या दुसऱ्या दिवशी रात्री साडेनऊ वाजता लालबाग राजाचे विसर्जन झाले. गिरगाव चौपाटीवर विसर्जनादरम्यान आलेली भरती आणि खास गुजरातहून विसर्जनासाठी आणलेल्या अत्याधुनिक तराफ्यावर मूर्ती चढवताना झालेली कसरत यामुळे राजाच्या विसर्जनाला यंदा ३६ तासांपेक्षा अधिक काळ लागला. या सगळ्यामुळे भाविकांचे प्राण मात्र कंठाशी आले होते.

मुंबईकरांचा लाडका आणि नवसाला पावणारा अशी लालबागच्या राजाची ओळख आहे. यंदा ६ सप्टेंबरला सकाळी १० वाजता लालबागच्या राजाची मिरवणूक गिरगाव चौपाटीवर येण्यासाठी २२ तास लागले. त्यानंतर दीड-दोन तासांत विसर्जन होणे अपेक्षित होते.

राजाच्या विसर्जनासाठी यंदा खास स्वयंचलित तराफा गुजरातवरून आणण्यात आला. त्याची उंची जास्त असल्याने भरतीच्या लाटांत मूर्ती तराफ्यावर चढविणे मंडळासाठी अशक्य झाले. परिणामी मूर्ती कित्येक तास चौपटीवरच होती.

वर्षानुवर्षे लालबागच्या विसर्जनाच्या सहभागी होणाऱ्या कोळी बांधवांनी यावर भाष्य करताना म्हटले की, काही



कारणांमुळे ओहोटी-भरतीचा अंदाज लालबागचा राजा मंडळाला आला नाही. आम्ही वाडकर बंधू बरीच वर्षे लालबागचा राजाचे विसर्जन करत आलो आहोत. मात्र काही कारणांमुळे राजाचे विसर्जन आता वाडकर बंधूंकडे नाही. गुजरातचा तराफा आल्यामुळे लालबागचा राजा मंडळाने हे कंत्राट त्यांना दिले आहे. पण यापुढे मंडळाने विसर्जनाची काळजी घ्यायला हवी, अशी प्रतिक्रिया गिरगाव चौपाटीचे नाखवा हिरालाल वाडकर यांनी दिली.

आजपर्यंत लालबागचा राजाच्या विसर्जनाला कधीही इतका वेळ लागला नव्हता. त्यामुळे यंदाच्या प्रकाराची सध्या चांगलीच चर्चा रंगली आहे. यापूर्वी अनेक वर्षे लालबागचा राजाचे विसर्जन हे कोळी बांधवांच्या मदतीने केले जात होते.

मात्र, यंदा विसर्जनासाठी गुजरातवरून आणलेला तराफा वापरला गेला. इतर सार्वजनिक मंडळांच्या गणपतींच्या विसर्जनासाठी बोटी वापरण्यात आल्या. मात्र, लालबाग राजा मंडळाने तराफ्यावरूनच विसर्जन करायचे, हा निर्णय कामय ठेवला.

'लालबागचा राजा'च्या विसर्जनासाठी यंदा गुजरातमध्ये तयार केलेला अत्याधुनिक मोटराइज्ड तराफा यंदा प्रथमच वापरण्यात आला. पूर्वीच्या तराफ्यापेक्षा याचा आकार दुप्पट असून याच्या तळाशी विशेष प्रोपेलर प्रणाली बसवण्यात आली आहे. लाटांचा वेग, दिशा लक्षात घेऊन स्थैर्य सांभाळताना हा तराफा स्वतःच नियंत्रण ठेवू शकतो.सायंकाळी ४.३० च्या दरम्यान भरती कमी झाल्यानंतर राजाची मूर्ती असणारी ट्रॉली पुढे सरकली आणि ती तराफ्यावर ठेवण्यात मंडळाला यश आले. यादरम्यान तराफ्यावर विराजमान होण्याआधी भाविकांची धाकधूक वाढली होती. 'मुंबईचा राजा'चे कार्यकर्तेही मदतीसाठी धावले.

## ढगांच्या लपंडावात अनुभवलं चंद्रग्रहण; मध्यरात्री विरळ पांढऱ्या ढगातून चंद्र डोकावला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अकोला**

खग्रास चंद्रग्रहण बघण्यासाठी रविवारी रात्री जनसामान्यांत खूपच उत्सुकता व आतूरता दिसून आली. दिवसभर सूर्याने अधून-मधून दर्शन देत रात्रीचे चंद्रग्रहण चांगल्यापैकी बघता येईल, अशी आशा जागवली; परंतु जसजशी रात्र सुरू झाली तशी ढगांची गर्दी वाढत होती आणि अवकाश प्रेमींच्या उत्साहावर पाणी फिरवण्यासाठी हलक्या पावसाच्या सरी देखील पडल्या. काहीसा उत्साह मावळत असतांनाच आकाशातील विरळ पांढऱ्या ढगातून चंद्र डोकावताना दिसला. ढगांच्या लपंडावात चंद्रग्रहण अनुभवता आले. नेहमीपेक्षा सर्व सामान्य लोकांमध्ये या



अनोख्या खगोलीय घटनेचे साक्षीदार होण्याचे प्रमाण वाढलेले दिसून आले, असे खगोल अभ्यासक प्रभाकर दोड यांनी सांगितले.

पृथ्वी ही सूर्य व चंद्राच्या मध्ये येते, तेव्हा पृथ्वीची सावली चंद्रावर पडल्याने चंद्रग्रहण दिसते. चंद्रग्रहण ही एक पूर्णतः वैज्ञानिक खगोलीय घटना आहे. सूर्य, पृथ्वी आणि चंद्र एका रेषेत आणि एका प्रतलात आल्यावर चंद्रग्रहण होते. चंद्राचा पृथ्वीच्या गडद सावलीतून प्रवास झाला, तर खग्रास किंवा खंडग्रास चंद्रग्रहण दिसते. भाद्रपद शुद्ध पौर्णिमेला रविवारी रात्री ९.५७ वाजता आपल्या डाव्या बाजूकडून चंद्रबिंब पृथ्वीच्या सावलीत येताना ग्रहण प्रारंभ झाले. यावेळी चंद्र कुंभ राशीत आणि सूर्य अगदी विरुद्ध बाजूला सिंह राशीत एकविसाव्या अंशावर होते.रात्री ११.४१ वाजता ग्रहणामध्ये, तर मध्यरात्री १.२६ वाजता चंद्रग्रहण मुक्त झाले. या चंद्र ग्रहणाच्या नोंदी घेतांना रात्री १०.१४, १०.२५, १०.३१, १०.४६ व १०.५१ या वेळात चंद्रग्रहण दर्शन सुलभ झाल्याचे दिसून आले. निसर्गाच्या या सावल्यांच्या खेळात लोकसहभाग वाढल्याचे चित्र होते. याच कालावधीत आकाश मध्याच्या जरा पश्चिमेस गरुड तारका समूहातील श्रवण आणि स्वर मंडळ तारका समूहातील अभिजित या तारकांचे दर्शन घडून आले, असे प्रभाकर दोड म्हणाले.

आता खग्रास चंद्रग्रहण पुढील वर्षी ३ मार्च २०२६ होणार आहे. या शिवाय आकाशातील विविध प्रकारच्या घडामोडी बघण्यासाठी कायम सज्ज राहण्याचे आवाहन विश्वभारतीचे प्रभाकर दोड यांनी केले आहे.

## उड्डाणपूल पाडणारच होता; मग अडीच कोटींचा दुरुपयोग कशासाठी?

### माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख यांचा थेट सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

येथील राजकमल चौक रेल्वे उड्डाणपूल सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्यानंतर त्यावर सर्वच स्तरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे. काँग्रेसचे नेते आणि माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनीही शासन-प्रशासनावर परखड शब्दात टीका केली आहे. उड्डाणूल पाडायचाच होता, तर आधी पुलाच्या सौंदर्यीकरणावर अडीच कोटी रुपये खर्च केले?, असा सवाल डॉ. देशमुख यांनी केला.



शहरातील पूर्व आणि पश्चिम भागाला जोडणारा महत्वाचा पूल आहे. वाहतूक बंद झाल्याने नागरिक त्रस्त आहेत. निर्णय प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव आहे. 'हम करे सो कायदा' अशी अवस्था असल्याचा आरोप डॉ. देशमुख यांनी केला आहे.

या पुलाला नेमके काय झाले, याविषयी शहरातील बहुसंख्य लोक अनभिज्ञ आहेत. अचानकपणे उड्डाणपुलावरील वाहतूक बंद होते, याला काय कारण आहे. राजकमल चौकातील हा पूल नादुरूस्त असल्याचे भाजपच्या खासदाराला दोन वर्षांपुर्वीच माहिती होते, असे सांगण्यात येत आहे. मग, दोन वर्षांपासून पाठपुरावा का करण्यात आला नाही, असा सवाल डॉ. सुनील देशमुख यांनी राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांचे नाव न घेता केला. त्यांनी यासंदर्भात पत्रव्यवहार केल्याचा दावा करण्यात येत असला, तरी त्यातून काय साध्य झाले, हा प्रश्न निर्माण होतो, असे ते म्हणाले.

### संपादकीय ......

# अमेरिकेचे दुटप्पी राजकारण : भारताची ठाम भूमिका

आंतरराष्ट्रीय राजकारणात काही क्षण असे येतात, जेव्हा एखाद्या राष्ट्राला ठामपणे सांगावे लागते – आता पुरे झाले, पुढे आमचे आम्ही पाहून घेऊ! भारतासाठी तो क्षण आला आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या वस्तूंवर करवाढीच्या धमक्या दिल्या. कारण सांगितले – भारत रशियाकडून तेल आयात करतो आणि ते इतर देशांना विकून नफा कमावतो. प्रत्यक्षात हा आरोप अमेरिकेच्या दुटप्पी धोरणाचेच द्योतक आहे.

युक्रेन युद्ध सुरू होण्यापूर्वी भारताच्या एकूण तेल आयातीत रशियाचा वाटा केवळ २.५ टक्के होता. पण २०२३ पर्यंत हा वाटा ३९ टक्क्यांवर गेला. भारताने स्वस्त तेल खरेदी करून देशातील इंधन दर स्थिर ठेवले. मात्र त्याच काळात युरोपियन युनियनचा रशियाशी व्यापार भारताच्या तुलनेत चारपट जास्त होता. तरीही अमेरिका आणि युरोप दोन्ही भारतालाच आरोपी ठरवत होते.

अमेरिका स्वतः रशियाकडून युरेनियम हेक्साफ्लोराईड, पॅलेडियम, खते, धातू, मौल्यवान दगड, पोलाद, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, लाकूड, अगदी विमाने आणि सुटे भागसुद्धा आयात करतो. या व्यापारामुळे युक्रेनवर अन्याय होत नाही का? पण भारताने तेल खरेदी केले तर तो नफेखोर? – हीच अमेरिकेची डबल ढोलकी भारताने उघडी पाडली आहे.ट्रम्प यांच्या करवाढीच्या धमक्या भारताला घाबरवू शकत नाहीत. चीनप्रमाणे सरकारच्या दबावावर चालणारी भारताची अर्थव्यवस्था नाही. भारताचे औद्योगिक विश्व वैविध्यपूर्ण आहे, सरकारवर अवलंबून नाही. देशांतर्गत बाजारपेठ इतकी मोठी आहे की, भारत स्वबळावर उत्पादन व उपभोग दोन्हीचे व्यवस्थापन करू शकतो.

आज भारताची अर्थव्यवस्था केवळ निर्यातीवर अवलंबून नाही. देशांतर्गत मागणी वेगाने वाढली आहे आणि जागतिक बाजारपेठेचे वैविध्यही वाढले आहे. त्यामुळे ट्रम्प यांनी करवाढ केली तरी भारताची गाडी अडखळणार नाही. उलट भारताने प्रतिहल्ला केला तर अमेरिकन कंपन्यांनाच तोटा होईल.

आज जगातील अनेक देश डॉलरला पर्याय निर्माण करण्यासाठी तयारीला लागले आहेत. ब्रिक्स राष्ट्रे स्वतंत्र पेमेंट सिस्टमबद्दल बोलत आहेत. पुरवठा साखळीचे वैविध्यीकरण हाच परवलीचा शब्द झाला आहे. अशा परिस्थितीत भारतासारख्या महाकाय बाजारपेठेला टार्गेट करणे म्हणजे अमेरिकेची आत्मघातकी चूक आहे.अमेरिका सतत निर्बंध लादते, करवाढ करते, आरोप करते – हे त्यांचे जुने धोरण आहे. पण, भारत हा आता प्यादा राहिलेला नाही. भारताने आज जर टॅरिफच्या दबावाला झुकून मान्यता दिली तर अमेरिका भविष्यात प्रत्येक व्यापार वादात त्याच पद्धतीने दडपण आणेल. म्हणूनच भारताने ठाम भूमिका घेणे अपरिहार्य होते.

भारताची ताकद केवळ अर्थव्यवस्थेत नाही, तर सॉफ्ट पॉवरमध्येही आहे. जगातील सर्वांत मोठी लोकशाही म्हणून भारताला मिळणारा सन्मान, त्याची संस्कृती, योग, पाककला, संगीत, चित्रपट, क्रिकेट, बुद्धिबळ, आयटी आणि संशोधनातील आघाडी – या सर्वांमुळे भारताला जगभर सद्भावना मिळते.भारत आंतरराष्ट्रीय संबंधांत परस्पर आदर, परस्पर हित आणि संवेदनशीलता या सूत्रावर चालतो. पण अमेरिका अजूनही हुकूमशाही पद्धतीने मित्र-शत्रू ठरवते. जुळून आले तर मित्र, अन्यथा शत्रू – हा त्यांचा दृष्टिकोन. भारत मात्र या खेळात अडकणार नाही.ट्रम्प कितीही धमक्या देत राहिले, करवाढीचे शस्त्र वापरले तरी भारत झुकणार नाही. भारत आता दोन दशकांपूर्वीप्रमाणे अमेरिकेवर अवलंबून नाही. आज भारत स्वतःच्या हितासाठी निर्णय घेतो आणि त्या निर्णयाचे जागतिक स्तरावर समर्थनही मिळवतो.

# विद्युत खांब हटवण्याऐवजी रस्ता तयार!

## प्रशासनाची बेफिकिरी की विकासाची थट्टा? नागरिक संतप्त

**विलास पाटील**
**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८वरूड** – शहरातील विकासकामांमधून नागरिकांच्या सोयीसाठी सुविधा निर्माण होण्याऐवजी, त्यांच्याच जीवाला धोका निर्माण करणारी कामे होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. वरूड शहरातील मुख्य रस्त्यावरील विद्युत खांब न हटवता थेट रस्त्याचे काँक्रिटीकरण पूर्ण करण्यात आले असून, यामुळे अपघाताची शक्यता अधिकच वाढली आहे.या प्रकारामुळे प्रशासनाच्या नियोजन क्षमतेवर, तसेच जबाबदारीच्या भावनेवर नागरिकांनी थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. रस्त्याच्या अगदी मधोमध उभा असलेला हा विद्युत खांब वाहनधारकांसाठी मृत्यूचा सापळा ठरत असून, विशेषतः रात्रीच्या वेळेस कमी प्रकाशात वा वेगात जाणाऱ्या वाहनांसाठी तो अत्यंत धोकादायक ठरतो.

या बेफिकीर निर्णयामुळे शहरातील नागरिक संतप्त झाले असून, विकासाच्या नावाखाली आमच्या जीवाशी खेळ चालला आहे, अशी टीका केली जात आहे. रस्त्यावर वाहतूक सुरू असूनही, कोणतीही सूचना फलक, अडथळा किंवा सुरक्षा उपाययोजना न करता हा खांब रस्त्याच्या मध्यभागी उभा आहे, ही गोष्ट धक्कादायक आहे.



या प्रकरणात वीज वितरण कंपनी व नगरपरिषद बांधकाम विभाग एकमेकांवर जबाबदारी ढकलत असून, कोणताही विभाग पुढाकार घेण्यास तयार नाही. ठेकेदाराने रस्ता पूर्ण केल्यानंतर खांब हलवण्याचा दावा करण्यात येत आहे, परंतु तोपर्यंत अपघात झाले तर जबाबदार कोण? हा प्रश्नही अनुत्तरित आहे.

जनतेच्या कररूपाने भरलेल्या पैशातून जर अशा निष्काळजीपणाची कामे केली जाणार असतील, तर ती प्रगती नसून थेट धोका आहे, असा संतप्त सूर नागरिकांनी व्यक्त केला आहे.या प्रकरणी तात्काळ लक्ष घालून रस्त्यातील विद्युत खांब हटवावा, तसेच संबंधित ठेकेदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी नागरिकांची ठाम मागणी आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे.अशा बेफिकीर कामांना चाप लावण्यासाठी प्रशासनाने आता तरी जागे व्हावे, अन्यथा त्याची किंमत नागरिकांच्या जीवाने चुकवावी लागेल, ही बाब लक्षात घ्यावी, असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.

# तिवसा भाग २ शेतशिवारात पगमार्क आढळले

## बिबट्यासह बछड्यांचा संचार, परीसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८तिवसा–** महामार्गा लागत असलेल्या तिवसा भाग दोन शेतशिवारात ६ सप्टेंबरला सकाळी ८ वाजता दरम्यान एक बिबट्या व त्याच्या दोन बच्छाड्याचे पगमार्ग आढळून आल्याने या भागातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. गेल्या काही दिवसापासून बिबट्या व दोन बच्छड्याचा वावर या भागात असल्यामुळे वनविभागाने बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.



तिवसा वनविभागाच्या वर्तुळा लागत असलेल्या शेत शिवारात बिबट्यासह इतर जंगली जनावरे आढळल्याच्या घटना सातत्याने घडतात. शेतकरी व जंगली जनावरांमध्ये नेहमीच सामना होतो तर शेतीचे नुकसान देखील होते. दरम्यान ६ सप्टेंबर रोजी तिवसा येथील शेतकरी लोहिया यांच्या शेतात पगमार्ग दिसून आल्याने या भागातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.–




## जेवल्यानंतर खा हे पान, पोटाच्या समस्या होतील दूर; वजनही होईल कमी

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक**

भारतात शतकानुशतके विड्यांची पाने ही पूजेसाठी वापरली जातात. मात्र हे पानआरोग्यासाठी एखाद्या टॉनिकसारखे आहे. कारण जेवणानंतर खाल्ले जाणारे हे पान आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक आहे. त्यात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, कॅल्शियम आणि अँटीऑक्सिडंट्स असतात जे शरीराचा अनेक आजारांपासून बचाव करतात.



आयुर्वेदात विड्याच्या पानांना औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण म्हटले जाते आणि पोटाच्या समस्या कमी करण्यासाठी दररोज जेवणानंतर हे पान खाणे हा सर्वात प्रभावी उपाय आहे. जर तुम्हाला गॅस, अपचन आणि तोंडाची दुर्गंधी यासारख्या समस्या होत असतील तर हे पान अत्यंत गुणकारी असते. विड्याच्या पानांचे फायदे आपण जाणून घेऊया

**पचनक्रिया सुधारते**

ही पाने पोटाच्या समस्या दूर करण्यास मदत करतात, गॅस, बद्धकोष्ठता आणि आम्लपित्त यापासून आराम मिळतो. या पानांमध्ये असलेले घटक पचन एंजाइम सक्रिय करतात, ज्यामुळे अन्न लवकर आणि सहज पचते.

**मधुमेह–** या पानांचे सेवन रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करते. ते इन्सुलिन नियंत्रित करते आणि मधुमेहाच्या रुग्णांसाठी खूप उपयुक्त मानले जाते.

**तोंडाची दुर्गंधी–** या पानांमुळे तोंडाची दुर्गंधी कमी होते, म्हणून जेवणानंतर दररोज विड्याचे पान खावे. तसेच या पानांमध्ये असलेले अँटीबॅक्टेरियल गुणधर्म हिरड्यांच्या समस्या आणि पोकळी रोखण्यासाठी देखील प्रभावी ठरतात.

**रोगप्रतिकारशक्ती–** ही पाने रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास प्रभावी आहेत, त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. दररोज ते खाल्ल्याने सर्दी आणि हंगामी संसर्गाचा धोका कमी होतो.

**वजन–** ही पाने चयापचय गतिमान करतात, ज्यामुळे चरबी जलद बर्न होते. म्हणून, वजन कमी करू इच्छिणाऱ्या लोकांनी जेवणानंतर हमखास एक तरी विड्याचे पण खावे.

**त्वचा आणि केस–** तुम्ही तुमच्या चेहऱ्यावर आणि केसांवर या पानांचा रस लावू शकता कारण ते त्वचा स्वच्छ करण्यास आणि केसांना मजबूत करण्यास मदत करते.

# यंदा रब्बी हंगामात ‘या’ सुधारित ज्वारी वाणांची लागवड ठरेल फायद्याची; हमी असेल अधिक उत्पादनाची




**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक**

ज्वारी हे महाराष्ट्रातील पारंपरिक आणि अत्यंत महत्त्वाचे अन्नधान्य पीक मानले जाते. राज्यातील बहुतांश भागांमध्ये हे पीक मुख्यत्वे रब्बी या हंगामात घेतले जाते. याकाळात हवामान कोरडे आणि थंड असल्याने ज्वारीच्या वाढीस पोषक वातावरण निर्माण होते. यामुळे ज्वारीचे उत्पादन अधिक गुणवत्तापूर्ण, टिकाऊ आणि स्वादिष्ट मिळते.

रब्बी ज्वारीचा उपयोग प्रामुख्याने मानवी आहारासाठी केला जातो. ग्रामीण भागात ज्वारीच्या भाकरीला पारंपरिक आणि पौष्टिक अन्न म्हणून महत्त्व आहे. याशिवाय ज्वारीच्या पिकातून मिळणारा कडबा (चारा) हा गुरांसाठी उत्तम आणि पोषणमूल्यपूर्ण खाद्यस्रोत ठरतो. त्यामुळे ज्वारी हे केवळ अन्नधान्य म्हणून नव्हे तर पशुखाद्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे पीक आहे.

आजच्या आधुनिक कृषी व्यवस्थेत बाजारात ज्वारीच्या असंख्य जाती आणि वाण उपलब्ध आहेत. मात्र सर्वच वाण हे शेतकऱ्यांच्या क्षेत्र, हवामान, जमिनीचा प्रकार आणि पाण्याच्या उपलब्धतेनुसार योग्य ठरतात असे नाही. त्यामुळे वाण निवडताना संशोधन संस्थांनी व कृषी विद्यापीठांनी विकसित केलेल्या आणि शासनाने शिफारस केलेल्या सुधारित जातींची निवड करणे अत्यंत आवश्यक ठरते.

या सुधारित जातींमध्ये विविध रोग व किडींपासून प्रतिकारशक्ती, कमी कालावधीत पक्वता, चांगली धान्य आणि कडबा उत्पादकता, तसेच प्रतिकूल हवामानातील सहनशीलता ही महत्त्वाची वैशिष्ट्ये असतात. काही जाती भाकरीसाठी योग्य असतात तर काही हुरडा, लाह्या किंवा कडब्याच्या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरतात. यामुळे शेतकऱ्यांना आपल्या गरजेनुसार आणि बाजाराच्या मागणीनुसार योग्य जातींची निवड करता येते.

सुधारित वाणांची लागवड केल्याने केवळ उत्पादनात वाढ होत नाही तर उत्पन्नातही लक्षणीय वाढ होते. कारण, दर्जेदार धान्याला बाजारात चांगला दर मिळतो. तसेच कीडरोगांचा प्रादुर्भाव कमी असल्यामुळे कीडनाशकांवरील खर्च वाचतो. योग्य वाणाची निवड आणि शिफारशीनुसार लागवड केल्यास अपेक्षित उत्पादन मिळवणे शक्य होते. परिणामी, शेतकऱ्यांचे शेतीवरील विश्वास व आत्मभान अधिक बळकट होते.

**लागवडीची शिफारस व तंत्रज्ञान–** लागवडीचा कालावधी : १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर.

पेरणीचे अंतर : ४५ १५ सें.मी.

खोली : ०५ सें.मी. पर्यंत.

रोपे : हेक्टरी सुमारे १.४८ लाख.

बियाण्याचे प्रमाण : हेक्टरी १० किलो (२ चाड्याच्या पाभरीने असल्यास).

बीजप्रक्रिया : प्रति किलो बियाण्यास ४ ग्रॅम ३०० मेश गंधक, २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर व पी.एस.बी. जिवाणूसंवर्धक, ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा बुरशी.




जमिनीच्या प्रकारानुसार शिफारस केलेले वाण

**वाणाचे नाव**

शिफारस व वैशिष्ट्ये

**फुले यशोमती–** हलक्या जमिनीसाठी, अवर्षण प्रवण भागात (२०२१ मध्ये प्रसारित). ११०-११५ दिवस. धान्य ०९-११ क्विंटल/हे., कडबा ४०-५० क्विंटल. भाकरी गोड आणि चवदार. खोडमाशी प्रतिकारक.

**फुले अनुराधा–** हलक्या जमिनीस योग्य. १०५-११० दिवस. धान्य ०८-१० क्विंटल, कडबा ३०-३५ क्विंटल. भाकरी व कडबा उत्तम.

**फुले सुचित्रा–** मध्यम जमिनीसाठी, अवर्षण भागात. १२०-१२५ दिवस. धान्य २४-२८ क्विंटल, कडबा ६०-६५ क्विंटल. दाणे शुभ्र व मोत्यासारखे. रोगप्रतिरोधक.

**परभणी मोती–** भारी जमिनीसाठी, मराठवाड्यात शिफारस. १२०-१२५ दिवस. धान्य १८-२० क्विंटल, कडबा ६५-७५ क्विंटल. दाणे टपोरे.

**परभणी सुपर मोती–** (२०१९ मध्ये प्रसारित) ११८-१२० दिवस. धान्य ३२ क्विंटल.

**परभणी शक्ती–** (२०१९ मध्ये प्रसारित) ११८-१२० दिवस. धान्य २१-२४ क्विंटल, कडबा ४५-६५ क्विंटल. भारी जमिनीसाठी योग्य.

**परभणी ज्योती–** (२००६ मध्ये प्रसारित) १२५-१३० दिवस. धान्य ३८-४० क्विंटल, कडबा ८८-९० क्विंटल. उंच वाढणारा पण न लोळणारा. ओलिताखाली योग्य. मावा प्रतिकारक.

**फुले वसुधा–** भारी जमिनीकरिता कोरडवाहू व बागायतीसाठी योग्य. ११६-१२० दिवस. धान्य २५-२८ क्विंटल, कडबा ५५-६० क्विंटल.

**फुले मधुर–** हुरड्यासाठी. मध्यम ते भारी जमीन. ९५-१०० दिवस. हुरडा ३०-३५ क्विंटल. चवदार व पचणारा.

**फुले पंचमी–** लाह्यांसाठी. मध्यम ते भारी जमिनीसाठी योग्य. ११५-१२० दिवस. लाह्या ८७.४% प्रमाणात. धान्य १२-१४ क्विंटल.

**फुले रेवती–** बागायती, भारी जमिनीसाठी. ११८-१२० दिवस. धान्य ४०-४५ क्विंटल, कडबा ९०-१०० क्विंटल. दाणे मोत्यासारखे शुभ्र. खोडमाशी प्रतिकारक.

रब्बी ज्वारीचे योग्य नियोजन व योग्य वाणांची निवड केल्यास शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळू शकते. कृषी विद्यापीठ व संशोधन संस्थांनी विकसित केलेल्या जातींचा लाभ घेणे ही काळाची गरज आहे.

**प्रा. संजय बडे,**
प्रा. के. एच शिरगापुरे
सहाय्यक प्राध्यापक, कृषी विद्या विभाग,
दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय, देहेगाव ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने
देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# पितृपक्षाच्या थाळीत कोणते पदार्थ असावे? जाणून घ्या नियम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. ८अमरावती –** ७ सप्टेंबरपासून पितृपक्षाला सुरूवात झाली आहे. हिंदू धर्मात पितृपक्षाला अत्यंत महत्त्व असून या दिवसांत पुर्वजांचे स्मरण केले जाते. या काळात पूर्वज आपल्या घरी येतात आणि कुटुंबाला आशीर्वाद देतात अशी मान्यता आहे. त्यासाठी पितरांना आवडणारे पदार्थ तयार केले जातात. मात्र या श्राद्धाच्या थाळीत कोणते पदार्थ असले पाहिजे? तसेच ताट वाढण्याचे नियम काय? खरे तर, श्राद्धाच्या दिवशी डावा, उजवा, समोरील व मध्य अशा चारी भागातील पदार्थ सांगितले आहेत. त्यालाच आपण चौरस स्वयंपाक म्हणतो. एरव्ही आपण मीठ, लिंबू, चटणी वाढण्यापासून सुरूवात करत असतो, परंतु श्राद्धाच्या ताटात मीठ आणि लिंबू सर्वात शेवटी आणि लागणार असेल तरच वाढतात.

**थाळीमध्ये काय असावे?**

चणा डाळ वडे, उडीद डाळ वडे, आलू वडी आणि भरड्याचे वडे, पाटवडी, तांदळाची खीर, कढी दही-भात, कुरडई, पापड असते. त्याचबरोबर भाज्यांमध्ये मेथीची भाजी, बटाटा भजी, लाल भोपळा भाजी, गवार भाजी, भेंडी



भाजी आणि कारल्याची भाजी यांचा समावेश होतो. पितृपक्षाच्या थाळीमध्ये कढी आणि तांदळाची खीर यांचे विशेष महत्व असते. मात्र पितृपक्षाच्या जेवणातील हे पदार्थ प्रांतानुसार आणि पद्धतींनुसार बदलतात. काही ठिकाणी कांडा लसूण विरहित स्वयंपाकही केला जातो.

**पितरांचे ताट वाढताना ही काळजी घ्या–** पितरांसाठी ताट वाढताना सर्व पदार्थ उलट क्रमाने वाढावे. ताटात मीठ, लिंबू सर्वात शेवटी वाढावे.सर्व भाज्या एका बाजूला आणि चटण्या दुसऱ्या बाजूला व्हाव्या. ताटाच्या मधोमध भात-वरण ठेवावे. तसेच मध्यभागीच कढी आणि खीर ठेवावी. कोशिंबीर किंवा भातावर वरण वाढताना त्याचा ओघळ इतर पदार्थांवर येऊ नये अशा पद्धतीने ताट वाढावे. पितर पुरणपोळीने तृप्त होतात. पुरणाच्या वासाने पितर तृप्त होतात. यामध्ये अनेक सत्त्व असल्याने पुरणपोळी म्हणतात. पितृपक्षाच्या थाळीमध्ये वरणभात हमखास असतेच. वरणभात हे अनेक पोषक घटकांनी भरपूर असते. पितृपक्षाच्या थाळीमध्ये तुम्ही वरणभात किंवा पुरी सोबत भेंडीची किंवा गवार, बटाटयाची भाजी करू शकता.

**पितृपक्ष महत्त्व–** हिंदू धर्मशास्त्रानुसार ज्याप्रमाणे आपल्या आयुष्यात ज्येष्ठांचे असणे गरजेचे असते त्याचप्रमाणे जे या जगात नाहीत अशा पित्तरांचे आर्शिवादही तितकेच महत्वाचे असतात. कारण जर पित्तरांची काळजी आपण घेतली नाही तर ते नाराज होतात. त्यामुळे आपल्या कामांमध्ये बाधा येते. काम होत नाहीत. सतत अडचणी येतात. त्यामुळे या पितृ पक्षात पिंडदान , श्राद्ध अशी पित्तरांची कार्य आवर्जून करावीत.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ८ सप्टेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# तिवसा तालुक्यातील शिरजगाव मोझरीला भूकंपाचे सौम्य झटके

## नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण; शासन स्तरावर मात्र नोंद नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ शिरजगाव मोझरी–** अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील शिरजगाव मोझरी गावाला आज सकाळी साडे दहा वाजताच्या सुमारास भूकंपाचे दोन सौम्य झटके बसल्याची घटना घडली. या घटनेने काही वेळासाठी गावात भीतीचं वातावरण निर्माण झालं.

ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, झटक्यांमुळे अनेक घरांमधील भांडी पडण्याच्या घटना घडल्या. विशेष म्हणजे गावातील एका ठिकाणी नाल्याला किरकोळ भेगा गेल्याचेही निदर्शनास आले आहे. यामुळे नागरिकांची चिंता



अधिकच वाढली आहे.याआधीही काही वर्षांपूर्वी या गावात दोन वेळा अशाच प्रकारचे भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले होते, अशी आठवण ग्रामस्थांनी व्यक्त केली. या घटनेची अधिकृत नोंद करण्यात आलेली नसली तरी ग्रामस्थांच्या अनुभवावरून भूकंपाचे सौम्य झटके बसल्याचे स्पष्ट होत आहे.घटनेनंतर काही काळासाठी लोक घराबाहेर आले होते, मात्र मोठ्या नुकसानाची माहिती अद्याप समोर आलेली नाही. स्थानिक प्रशासनाने याची दखल घेत तपासणीसाठी यंत्रणा कार्यरत केली आहे.सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरीही, अशा नैसर्गिक घटना भविष्यात अधिक गंभीर रूप घेऊ शकतात, याकडे प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

### भूकंपाचे धक्के बसल्याबाबत कोणतीही नोंद नाही

अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुका मौजे शिरजगाव मोझरी येथे आज सकाळी ११.०० वाजता भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. याबाबत नॅशनल सिशनोलॉजीकल डिपार्टमेंट ऑफ इंडिया यांचे संकेतस्थळावर सदर भूकंपाचे धक्के जाणवल्याबाबत तपासणी केली असता भूकंपाचे धक्के बसल्याबाबत कोणतीही नोंद आढळून आली नाही. जिल्हा प्रशासन याबाबत सतर्क असून तहसीलदार, तिवसा व महसूल विभागाचे पथक शिरजगाव मोझरी या गावांमध्ये जाऊन नुकसानीबाबत पाहणी केली असता कोणत्याही प्रकारचे जीवितहानी किंवा नुकसान झाल्याचे आढळून आले नाही. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालय,अमरावतीच्या वतीने करण्यात येत आहे.

# बाप्पाला निरोप देताना घडले अघटित

# अमरावती जिल्ह्यात तिघांचा मृत्यू

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.८ धामणगाव रेल्वे** लाडक्या गणरायाला





काल सायंकाळी अनंत चतुर्थीच्या दिवशी भावपूर्ण निरोप देण्यात आला. मात्र लाडक्या गणरायाला निरोप देताना काही ठिकाणी दुर्दैवी घटना घडल्याचे समोर आले आहे. यात अमरावती जिल्ह्यात तीन वेगवेगळ्या घडलेल्या घटनांमध्ये तिघांचा विसर्जनावेळी बुडून मृत्यू झाला आहे. यामुळे विसर्जनाच्या उत्साहात दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

दहा दिवसांचा गणेशोत्सव पार पाडल्यानंतर लाडक्या गणरायाचे विसर्जन करून भावपूर्ण निरोप देण्यात आला. बाप्पाला निरोप देताना चिमुकल्यांना अश्रू अनावर झाले होते. तर दुसरीकडे जल्लोषात विसर्जन मिरवणूक काढत बाप्पाला विसर्जित करण्यात आले. मात्र या विसर्जनावेळी काही ठिकाणी दुर्दैवी घटना घडल्या असून नदीवर विसर्जनासाठी गेले असता पाण्यात बुडून मृत्यू झाल्याच्या घटना राज्यात ठिकठिकाणी घडल्या आहेत. अशीच घटना अमरावती जिल्ह्यात देखील घडल्या आहेत.

### दोन तरुण गेले वाहून

आपल्या लाडक्या गणपती बाप्पाला निरोप देताना गणपती विसर्जनाला अमरावती जिल्ह्यात तीन वेगवेगळ्या घटनेत तीन ठिकाणी गालबोट लागले आहे. यामध्ये नदीपात्रात बुडून तिघांचा मृत्यू झाला आहे. यात धामणगाव रेल्वे तालुक्यातील वाघोली येथे युवक करण चव्हाण (वय २२) गणपती विसर्जनच्या वेळी त्याचा पाय घसरला आणि तो पाण्यात पडला आणि पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. दुसऱ्या घटनेत मेळघाटमध्ये धूळघाट रोडवर गडगा नदी पात्रात गणेश विसर्जना वेळी अनिल माकोडे हा युवक वाहून गेला आहे.

### चंद्रभागा नदीत तरुणी बुडाली

तर तिसऱ्या घटनेत दर्यापूर शहरातील चंद्रभागा नदीपात्रात गणपती विसर्जनासाठी गेलेली तरुणी मुक्ता श्रीनाथ (वय ३२) या तरुणीचा खोल पाण्यात गेल्याने मृत्यू झाला. या तिन्ही घटनेत तिघांचा मृत्यू झाला आहे. या घटनांमुळे गणेश विसर्जनाच्या उत्साहात दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यामुळे या घटनेमुळे अमरावती जिल्ह्यात शोककळा पसरली आहे.

# अवैध धंद्यांना पूर्णविराम, रोजगार सेवक संकेत चापके याची हकालपट्टी

## नांदगाव पेठ येथील ग्रामसभा ठरली वादळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नांदगाव पेठ**
नुकतीच झालेली ग्रामसभा गावाच्या राजकारणात व प्रशासनात नवा इतिहास रचणारी ठरली. गावातील अवैध धंदे हा ग्रामसभेतील सर्वात ज्वलंत मुद्दा ठरला. ग्रामपंचायत सदस्य छत्रपती पटके यांनी गावात काही व्यक्तींमार्फत सुरू असलेल्या अवैध धंद्यांचा थेट पर्दाफाश केला. गावाच्या शांततेला, युवकांच्या भविष्याला आणि सामाजिक आरोग्याला धोका पोहोचवणाऱ्या या धंद्यांना ग्रामसभेतून एकमुखाने थांबविण्याचा ठराव घेण्यात आला.

गावात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे सुरू राहणार नाहीत, दोषींवर कठोर कारवाई केली जाईल,असा ठाम इशारा ग्रामस्थांनीच दिला. या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस आयुक्त व स्थानिक पोलीस निरीक्षकांना लेखी सूचना देऊन कार्यवाहीची मागणी करण्यात आली.याच ग्रामसभेत दुसरा मुद्दा अधिक वादग्रस्त ठरला तो म्हणजे रोजगार सेवक संकेत चापके याच्या भ्रष्ट कारभाराचा. रोजगार योजनांमध्ये अफरातफर, बनावट कामांची नोंद, लाखोंची बिले काढून निधीचा अपव्यय, अशा अनेक गंभीर आरोपांची उकल ग्रामसभेत झाली.



### १७ पैकी ४ सदस्य सभेला उपस्थित

ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायतचे १७ पैकी केवळ ४ सदस्य हजर होते.याबद्दल उपस्थितीत गावकऱ्यांनी खंत व्यक्त केली तसेच गावातील कर्मचाऱ्यांचा सुद्धा अल्पसा प्रतिसाद ग्रामसभेला दिसून आला त्यामुळे त्या त्या विभागाच्या वरिष्ठांना लेखी पत्र देऊन त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्याची मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार यांनी केली.ग्रामसभेमध्ये पांदण रस्ते मोकळे करण्याची समिती व महिला बालकल्याण नियोजन समिती स्थापन करण्यात आली.

ग्रामस्थांचा संताप इतका वाढला की अखेर एकमुखाने ठराव घेऊन त्याला पदावरून तात्काळ कमी करण्यात आले. गावाच्या पैशावर डल्ला मारणाऱ्यांना ग्रामसभा सोडणार नाही,असा संदेश यावेळी देण्यात आला.ग्रामसभेतील या ऐतिहासिक ठरावांमुळे नांदगाव पेठ गाव भ्रष्टाचारमुक्त व अवैध धंदेमुक्त होण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकत आहे. ग्रामस्थांच्या ऐक्याने व न्यायाच्या लढ्याने ग्रामसभा खऱ्या अर्थाने गावाचे भविष्य बदलणारी ठरली आहे.या ग्रामसभेला सभेच्या अध्यक्ष सरपंचा कविता डांगे,उपसरपंच मजरखा ग्रामपंचायत सदस्य आशा चंदेल, छत्रपती पटके,माजी जि.प.सदस्य नितीन हटवार, मोरेश्वर इंगळे,दिलीप चौधरी, अरुण राऊत,मोहन शेंदरकर, प्रकाश शेळके, ग्राम विकास अधिकारी हर्षदा बोंडे, तलाठी आदेश गजभिये नितीन सत्रे,राजू भगत, संतोष शेंदरकर,नंदिनी साबळे, मंगला भोडेकर यांच्यासह अनेक युवक,नागरिक उपस्थित होते.

# 'गणरायाला घरी पाठवू नका' चिमुकली हुंदका देत रडली

## श्रीजाच्या निरागस श्रद्धेने सर्वांचे मन जिंकले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती–** दहा दिवस गणरायाची मनोभावे पुजा, आरती आणि सेवा केल्यानंतर अखेर गणरायाला निरोप द्यावा लागतो. शनिवारी राज्यातील विविध भागांमध्ये विसर्जन सोहळा पार पडला. भक्तांनी जड अंतःकरणाने गणरायाला निरोप दिला. मात्र, लाडक्या गणपती बाप्पाला निरोप देताना चिमुकल्या धाय मोकलून रडल्या. लहानग्यांचे १० दिवस अगदीच आनंदात जातात. मात्र, गणेश विसर्जनाच्या दिवशी लहानग्यांना अश्रू अनावर होतात. अमरावतीतील चिमुकलीलाही गणरायाला निरोप देताना अश्रू अनावर झाले.

दहा दिवस गणरायाची मनोभावे पुजा, आरती आणि सेवा केल्यानंतर अखेर गणरायाला निरोप द्यावा लागतो. शनिवारी राज्यातील विविध भागांमध्ये विसर्जन सोहळा पार पडला. भक्तांनी जड अंतःकरणाने गणरायाला निरोप दिला. मात्र, लाडक्या गणपती बाप्पाला निरोप देताना चिमुकल्या धाय मोकलून रडल्या. लहानग्यांचे १० दिवस अगदीच आनंदात जातात. मात्र, गणेश विसर्जनाच्या दिवशी लहानग्यांना अश्रू अनावर होतात. अमरावतीतील चिमुकलीलाही गणरायाला



निरोप देताना अश्रू अनावर झाले.

गणपती बाप्पाला निरोप देताना अमरावतीतील चिमुकली धाय मोकलून रडली. श्रीजा थोरात असं चिमुकलीचं नाव आहे. ती अमरावतीच्या विद्यापीठ परिसरातील दत्तविहार कॉलनीतील रहिवासी असल्याची माहिती आहे. सध्या श्रीजाचा भावनिक व्हिडिओ व्हायरल होत आहे.

व्हिडिओमध्ये घरातील सदस्य गणपती बाप्पाची आरती करून विसर्जनाची तयारी करत आहेत. याचवेळी चिमुकलीला अश्रू अनावर झाले. घरातील सदस्य गणरायाला आसनावरून उचलून घराभोवती प्रदक्षिणा घालतात. याचवेळी चिमुकली धाय मोकलून रडायला सुरूवात करते.

'गणरायाला घरी पाठवू नका' असं म्हणत जोरजोराने रडू लागते. विसर्जनावेळी ती आईचा पदर खेचून रडते. घरातील सदस्य तिची समजूत काढतात, मात्र ती ऐकत नाही. तिचं रडणं सुरू असतं. सध्या चिमुकलीचा व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल होत आहे. श्रीजाच्या निरागस श्रद्धेने सर्वांचे मन जिंकले आहे.

# प्रारुप प्रभाग रचना आतापर्यंत दोन आक्षेप दाखल,

## हमीद शद्दा, धिरज हिवसे यांच्या हरकती


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**,महापालिका निवडणूक प्रक्रिये अंतर्गत प्रारुप प्रभाग रचना ३ सप्टेंबर रोजी जाहिर झाली होती. त्यावर १५ सप्टेंबरपर्यंत आक्षेप, हरकती घेण्याची मुदत आहे. या अनुषंगाने माजी नगरसवेक हमीद शद्दा आणि माजी नगरसेवक धिरज हिवसे यांनी दोन आक्षेप दाखल केले आहे.

माजीनगरसेवकधिर जहिवसे यांनी रविवार ७सप्टेंबर रोजी आक्षेप दाखल केला आहे. प्रभाग क्रमांक५–महेंद्र कॉलनीबाबत त्यांनी हरकत दाखल केली आहे. त्यांच्यामते, प्रभाग क्रमांक पाचमध्ये प्रत्यक्षात रचनेप्रमाणे नाव व नगरात प्रथमेष गवई यांच्या घरापासून असा उल्लेख करण्यात आला आहे. तो चुकीचा झाला आहे. नकाशा प्रमाणे गौतम निकाळजे यांच्या घरापासून असा करण्यात यावा,





अशी हरकत हिवसे यांनी घेतली आहे.तर, माजी नगरसेवक हमिद शद्दा



यांनी प्रभाग १५ छायानगर गवळीपुरा मध्ये घेतला आहे. गवळीपुरा परीसर हा प्रभाग–६ मोरबागमध्ये गेला आहे. मात्र प्रभाग १५ ला गवळ पुरा असे नाव दिले आहे. त्यामुळे यात बदल करण्यात यावा, अशी हरकत शद्दा यांनी घेतली आहे.

# चार वर्षांच्या अद्विकने लाठी–काठीच्या कौशल्याने जिंकले गणेश भक्तांचे मन!

## हनुमान व्यायाम क्रीडा मंडळाच्या तिसऱ्या पिढीचा उत्साहवर्धक सहभाग

***विदर्भ प्रजासत्ताक***
***दि.८दर्यापूर –***
*गणेशोत्सव मिरवणुकीचे अनेक पैलू लक्ष वेधून घेतात, मात्र यंदाच्या दर्यापूर येथील मिरवणुकीमध्ये एक छोटा पण लक्षणीय चेहरा सर्वांच्या नजरा खिळवून गेला – वय केवळ चार वर्षांचा अद्विक रोहित धुराटे!*

*भरोसा येथील हनुमान व्यायाम क्रीडा मंडळ या नामवंत व्यायामशाळेचे मार्गदर्शक गोविंद भाऊ धुराटे यांच्या तिसऱ्या पिढीतील प्रतिनिधी म्हणून अद्विकने यंदाच्या गणेश मिरवणुकीत लाठी–काठी, दोन्ही हातात दोन काड्या, उड्या, बैठक, लेझीम, सूर्यनमस्कार यासह विविध मर्दानी खेळांचे उत्तम सादरीकरण करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.*


*अद्विक सध्या आदर्श प्राथमिक कॉन्व्हेंट शाळेत के.जी. १ मध्ये शिक्षण घेत आहे, परंतु त्याचे व्यायामातील कौशल्य पाहून अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. व्यायाम आणि शिस्तीचा वारसा लाभलेल्या अद्विकने आपल्या लाठी–काठीच्या जोरदार*



*प्रात्यक्षिकांनी उपस्थित गणेश भक्तांची मने जिंकली. त्याच्या प्रदर्शनामुळे जमलेल्या गर्दीतून टाळ्यांचा कडकडाट झाला आणि अनेकांनी त्याच्यावर रोख बक्षिसांचा वर्षाव केला.गोविंद भाऊ धुराटे यांनी ज्येष्ठ पिढीतून सुरु केलेली मर्दानी क्रीडांची परंपरा आता नातवंडांपर्यंत पोहोचली असून, या परंपरेचा अभिमान वाटावा अशी साद मिरवणुकीत अनुभवायला मिळाली. हनुमान व्यायाम क्रीडा मंडळात शिकवले जाणारे पारंपरिक व मर्दानी खेळ आजही नव्या पिढीत रुजवण्याचे कार्य सुरूच आहे, आणि अद्विक हे त्याचे जिवंत उदाहरण ठरले आहे.अद्विकच्या या सहभागाबद्दल धुराटे कुटुंबाचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत असून, गावकऱ्यांनीही त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. गणेश मिरवणुकीतील हे अनोखे आकर्षण खरोखरच प्रेरणादायी ठरले.छोट्याशा वयात मोठा ठसा उमठवणाऱ्या अद्विकने दाखवून दिलं की, वय नव्हे तर जिद्द आणि परंपरेची ओढ माणसाला मोठं करतं!*

# राणा दाम्पत्यांच्या गणरायाला भावपूर्ण निरोप

## छत्री तलावावर भक्तांच्या विसर्जनात घेतला भक्तिभावाने सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ अमरावती –** शहरात गणेश विसर्जनाचा उत्सव भक्तिभावाने साजरा होत असताना, भाजपा नेत्या मा.खा.नवनीत राणा आणि आ.रवी राणा यांनी देखील शनिवारी रात्री आपल्या घरच्या बाप्पाला छत्री तलाव येथे गणपतीचे विसर्जन करुन भावपूर्ण निरोप दिला.अमरावती महानगरपालिकेच्या वतीने छत्री तलाव परिसरात गणेश विसर्जनासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. सकाळपासूनच भाविक आपल्या लाडक्या गणरायाला जल्लोषात, पण भक्तिभावाने निरोप देत होते. याच ठिकाणी सायंकाळच्या सुमारास राणा दाम्पत्यही उपस्थित राहिले आणि त्यांनी गणपती बाप्पाची मनोभावे पूजा करून, विसर्जन प्रक्रियेत इतर भाविकांसह सहभाग घेतला व अनेक भाविकांसोबत गणपती बाप्पाची आरती सुद्धा केली. गणेशोत्सव दरम्यान राणा कुटुंबाच्या गंगा सावित्री निवासस्थानी दरवर्षी गणरायाची प्रतिष्ठापना केली जाते. यंदाही गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विसर्जनाच्या वेळी भाजपा नेत्या मा.खा.नवनीत राणा आणि आ.रवी राणा यांनी भाविकांमध्ये मिसळून, कोणत्याही औपचारिकतेशिवाय गणपती बाप्पाची पूजा-अर्चा करून भावपूर्ण निरोप दिला.त्यांच्या उपस्थितीमुळे अनेक नागरिकांनी त्यांच्यासोबत फोटो घेतले व संवाद साधला. सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होताना त्यांनी कोणतीही राजकीय भूमिका न घेता एक श्रद्धावान भक्त म्हणून उपस्थित राहून, साधेपणात गणेशभक्तीचा आदर्श निर्माण केला. शहरात उत्सवाच्या दरम्यान भाजपा नेत्या मा.खा.नवनीत राणा आणि आ.रवी राणा यांचा हा सहभाग चर्चेचा विषय ठरत असून, भक्तिभाव आणि जनसंपर्क याचे सुंदर उदाहरण म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे.

# लिफ्ट मिळताच दुचाकीस्वाराच्या गळ्याला लावला चाकू

## रोख, मोबाइल अन् दुचाकी घेऊन पसार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ दिग्रस (यवतमाळ) :** दुचाकीने गावी परत जाणाऱ्या युवकाला अज्ञात दोघांनी रात्री लिफ्ट मागितली. नंतर काही अंतरावर नेऊन त्यालाच बेदम मारहाण करत त्याच्या जवळची रोख रक्कम, मोबाइल व दुचाकी हिसकावून पसार झाले. ही घटना तालुक्यातील वाईमेंढी मार्गावर मंगळवार, दि. १९ ऑगस्टच्या रात्री घडली.

दिग्रस पोलिसांनी अज्ञता दोघांविरोधात दि. २३ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल केला.

प्रवीण रामचंद्र वांझाड (रा. तुपटाकळी) हा युवक एमएच २९ सीडी १२११ क्रमांकाच्या दुचाकीने गावाकडे जात होता. त्याला रस्त्याच्या कडेवर दोघेजण पायदळ जाताना दिसले. त्यांनी हात दाखवून मदत मागितली. प्रवीण सुद्धा मदतीसाठी थांबला. त्या दोघांनी पुढच्या गावात जायचे असे सांगितले. लगेच प्रवीण याने त्यांना दुचाकीवर बसविले, मात्र काही अंतर जात नाही तोच त्यातील एकाने प्रवीच्या गळ्याला चाकू लावला. थापड बुक्क्यांनी मारहाण सुरू केली.

# धाडस आणि सेवाभावाचा सन्मान

## बेनोड्यात बालकृष्ण गणेश मंडळाचा सत्कार सोहळा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ वरुड–** सेवाभाव आणि कर्तृत्व यांचा संगम असलेला अविस्मरणीय सत्कार समारंभ दि. ६ सप्टेंबर रोजी बेनोडा येथील गुजरी बाजार चौकात बालकृष्ण गणेश उत्सव मंडळातर्फे पार पडला. या कार्यक्रमात गावातील मान्यवरांचा शाल-श्रीफळ व बक्षिस देऊन गौरव करण्यात आला.

सर्वाधिक हृदयस्पर्शी क्षण ठरला तो जगदीश मासोदकर यांचा सत्कार. ॲडव्होकेट नीरज टावरी यांचा चिमुकला मुलगा आरव पेठ येथील पुलावरून पाण्यात पडला होता. खोल पाण्यात जीव धोक्यात असताना, क्षणाचाही विचार न करता जगदीशने पाण्यात उडी घेतली आणि मुलाचे प्राण वाचवले. त्यांच्या या धाडसी कृतीमुळे एका निरागस जीवाला पुनर्जन्म मिळाला. या शौर्यगौरवाबद्दल मंडळाच्यावतीने त्यांचा शाल, श्रीफळ आणि अकरा हजार रुपयांच्या रोख बक्षिसासह सत्कार करण्यात आला.

याच कार्यक्रमात डॉ. व्ही. आर. अढाऊ यांची अष्टविनायक संस्थेच्या अध्यक्षपदी झालेली निवड व त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून गावासाठी केलेली सेवा लक्षात घेऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

बेनोडा पोलिस ठाण्याचे नवीन ठाणेदार विवेक देशमुख यांचे आगमन झाल्याने त्यांचाही सत्कार करून गावाच्या कायदा-सुव्यवस्थेसाठी त्यांच्या कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच अक्षय चोरे यांची ग्राम महसूल अधिकारी म्हणून झालेली निवड ही गावासाठी अभिमानाची बाब ठरल्याने त्यांचाही मान्यवर सन्मान करण्यात आला.

या भव्य सोहळ्याचे अध्यक्षस्थान ठाणेदार विवेक देशमुख यांनी भूषविले.कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वी पार पाडण्यासाठी मंडळातील कार्यकर्ते श्याम चोरे, राम चोरे, प्रफुल गावंडे, रोशन लाड, अंकुश निंभोरकर, मनोज टावरी, पंकज गोहाड, अमोल गोहाड, तेजस फरकाडे, अश्वेघ चोरे, हार्दिक पापडकर, मनोज चोरे, आयुष चोरे, सुनिल पुंड यांनी परिश्रम घेतले.

हा सोहळा गावाच्या सामाजिक जीवनात धाडस, सेवा व कर्तव्यभावना या मूल्यांना अधोरेखित करणारा ठरला.

# डीजे,ढोल-ताशांना नकार

## भक्तीच्या गजरात गणेश विसर्जनाचा पारंपरिक सोहळा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ नांदगाव खंडेश्वर**

शहरातील अण्णाभाऊ साठे चौकातील राधे गणेशोत्सव मंडळाने पारंपरिक पद्धतीने ढोल ताशे गुलाल डिजे याला फाटा देत वारकरी दिंडीने गणेश विसर्जन मिरवणूक काढून महापुरुषांच्या वेशभूषेने गणपती विसर्जन केले या मिरवणुकीने नांदगाव वासियांचे लक्ष वेधले शांतता प्रिय वातावरणात गणेशोत्सव साजरा करून स्तुत्य उपक्रम राबविला उत्सव म्हटला की ढोल ताशा सजावट जल्लोषाने केला जातो मात्र राधे गणेशोत्सव मंडळाने दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा आगळावेगळा गणेशोत्सव साजरा केला दहा दिवसीय विविध सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते गणपती विसर्जन मिरवणुकीत पारंपारिक पद्धतीने भारतीय संस्कृतीचे जतन करून डीजे, ढोल ताशे याला फाटा देत गुलाल न उधळता मिरवणुकीवर फुलांचा वर्षाव करून वारकरी दिंड्या लहान मुलींचे लेझीम पथक विशेष आकर्षण होते अकरा बैल जोड्याचा रथ ज्यात गणेशाची मूर्ती विराजमान होती महिलांची दिंडी छत्रपती शिवाजी महाराज डॉ बाबासाहेब आंबेडकर,अण्णाभाऊ साठे महात्मा ज्योतिबा फुले तुकडोजी महाराज गाडगेबाबा, लोकमान्य टिळक,स्वामी विवेकानंद, शहीद विकास उईके यांच्या प्रतिमा सुद्धा देखाव्यात होत्या तसेच मंडळाच्या कार्यकर्त्यांनी घातलेला विशिष्ट पोशाख उपस्थितांना आकर्षित करीत होता यावेळी महिलांची लक्षणीय उपस्थिती होती अतिशय शांतता प्रिय वातावरणात गणपती विसर्जन मिरवणूक पार पडली ठाणेदार श्रीराम लांबाडे यांनी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवला. सामाजिक कार्यकर्ते प्रकाश मारोटकर यांनी नियोजनबद्ध मिरवणुकीचे आयोजन केले होते मंडळाचे अध्यक्ष अक्षय हिवराळे भूमेश्वर गोरे निलेश मारोटकर गजानन तायडे पवन जेवढे प्रेम हिवराळे अनिकेत गटूले श्रीकृष्ण कांबळे महेश वानखडे मनीष चौधरी मयूर वानखडे आकाश मंगळे निलेश झिमटे जय मोकळेकर भीमराव जेवढे दीपक तानकरींप्रदीप चौधरी शुभम मोकडेकर कार्तिक सोनवणे अमन मानकर पवन शिरभाते सुभाष लोखंडे इत्यादी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले–

# ‘स्वर विदर्भाचा’ भव्य गीतगायन स्पर्धेत

## अकोल्याच्या मलंग शहांचा गजर



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८वरूड–** स्व. श्री. वामनराव केशवराव देशपांडे कला व क्रीडा अकादमी पांढरघाटी, शाळा व्यवस्थापन समिती पांढरघाटी तसेच सुर-संगम टीचर्स म्युझिकल ग्रुप वरुड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विदर्भस्तरीय भव्य खुली गीतगायन स्पर्धा – ‘स्वर विदर्भाचा’ हा सोहळा अतिशय उत्साहात आणि संगीताच्या जल्लोषात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन वरुड-मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंदू यावलकर यांच्या हस्ते झाले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुग्धा देशपांडे या होत्या. प्रमुख अतिथी म्हणून ठाणेदार अर्जुन ठोसरे, अनिल वऱ्हेकर, डॉ. राम गोधने, माजी प्रशासन अधिकारी वसंतराव डबरासे, जामगाव सेवा सहकारी सोसायटीचे संचालक विलास पाटील, विस्तार अधिकारी दिलीप बुरंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या स्पर्धेत विदर्भातील अनेक गायक-गायिकांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. अंतिम फेरीत मलंगशहा अकोला यांनी पहिला क्रमांक पटकाविला, तर चिमुकली गायक श्रीमयी धर्मपाल चिंचोळकर हिने दुसऱ्या क्रमांकाचे यश मिळविले. तिसऱ्या क्रमांकाचे मानकरी कृष्णा सतीश सावरकर ठरले.

प्रोत्साहनपर बक्षिसांनी तनिष्क गजभिये (नागपूर), केतन दुर्गे (लोणी), नंदनी गोडबोले, कावेरी खराटे (मांगरूळी), सौंदर्या वानखडे (अकोला), कश्मीरा कानफाडे (मोर्शी), अनघा लोणारे (यवतमाळ), संजय इंगळे (मोर्शी) यांचा गौरव करण्यात आला.स्पर्धेचे परीक्षण करण्याची जबाबदारी इंडियन ऑयडल सीझन-२ उपविजेती यशश्री भावे पाठक (मुंबई), विदर्भ तालमणी धीरेंद्र गावंडे (कारंजा लाड), टीव्ही कलाकार प्रसाद उलांडे (सातारा), तसेच पी. कुमार (नागपूर) यांनी पार पाडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधीर कांबळे यांनी केले, तर नरेंद्र पाटील यांनी ओघवत्या शब्दात सूत्रसंचालन केले. आभार प्रदर्शन भारतभूषण चौधरी यांनी केले.

संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नामदेव सानप, राहुल फुले, रितेश कुबडे, मयूर सावरकर, विनोद कुबडे, अनिल अहाके, विजय इडपाची, सुभाष तरुडकर, विजय बाळापुरे, प्रफुल बरडे, राधेश्याम कुंभार, जगदीश परतेती, माला आहाके, उषाताई दुर्गे, छबीताई इडपाची, खुशी अमोदे, जयश्री नागले, राम बंदे, तुषार दवंडे, योगेश बीसांद्रे, चेतन सिनकर, शुभम अकर्ते, पंकज लेकुरवाळे, गिरीश शर्मा, संजय बेलसरे, दीप बेलसरे, मुकेश मारुडकर, प्रतीक पंडागळे व जितेंद्र शेटीये यांचे विशेष प्रयत्न उल्लेखनीय ठरले.

कार्यक्रमाची रंगत वाढविण्यासाठी तबला शितल मांडवगडे, कीबोर्ड सुधीर काळे, गिटार दिनेश कांबळे, ऑक्टोपॅड चेतन ठोंबरे, ढोलक गौरव वाघमारे, मायनर अंश कांबळे यांनी वादन करून रसिकांना मंत्रमुग्ध केले.‘स्वर विदर्भाचा’ ही स्पर्धा केवळ गीतगायनापुरती मर्यादित न राहता विदर्भातील कला व संस्कृतीचा संगम ठरली असून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# सुशिल बेले यांचा महावितरणवर हल्लाबोल – तीव्र आंदोलनाची घंटा वाजली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८वरूड–** उन्हाळ्यात महावितरणच्या निष्काळजीपणामुळे कमी-जास्त व्होल्टेजचा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो. त्यामुळे घरगुती विद्युत उपकरणं वारंवार बिघडत असून, त्याचवेळी महागडी वीजबिलंही भरावी लागत आहेत. पावसाळ्यात हीच समस्या अधिक बिकट रूप धारण करते. महावितरणकडून अचानक सुरू होणाऱ्या मेंटेनन्स कामांमुळे शहरासह ग्रामीण भागात वारंवार वीजपुरवठा खंडित होतो आणि नागरिक अक्षरशः अंधारात राहतात. घरातील मीटर बिघडला किंवा वॉर्डातील लाईन गेली तरी तक्रारींवर २-३ दिवस अधिकारी लक्ष देत नाहीत, ही बाब नागरिकांसाठी चांगलीच त्रासदायक ठरत आहे. महावितरणने



उन्हाळ्यात वेळेत देखभाल करण्याऐवजी झोप घेतली आणि पावसाळ्यात काम करून जनतेला हैराण केलं जात आहे, असा आरोप नागरिकांकडून होत आहे.

याच मुद्द्यावर आक्रोश जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष सुशिल बेले यांनी तीव्र भूमिका घेतली आहे. त्यांनी स्पष्ट इशारा देताना म्हटलं की, कमी-जास्त व्होल्टेज, पावसाळ्यातील खंडित पुरवठा आणि तक्रारींवर २-३ दिवस दुर्लक्ष हा नागरिकांवरील अन्याय थांबला नाही, तर आम्ही महावितरणविरोधात तीव्र आंदोलन छेडू.सध्या नागरिकांत मोठा संताप असून, जर परिस्थितीवर तातडीने तोडगा काढला गेला नाही, तर रस्त्यावर उतरून महावितरणविरोधात जनआक्रोश पेट घेण्याची चिन्हं दिसत आहेत.

# खोलापुरात शांततेत पार पडली सार्वजनिक गणेश विसर्जन मिरवणूक

## हिंदू-मुस्लिम एकतेचे दिले उत्तम उदाहरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ वाठोडा शुक्लेश्वर** – भातकुली तालुक्यातील खोलापुर पोलीस स्टेशन हद्दीतील सार्वजनिक गणेशोत्सव मिरवणुका यंदा शांततेत आणि सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडल्या. एकूण २९ सार्वजनिक गणेश मंडळांपैकी १४ मंडळांच्या विसर्जन मिरवणुका शनिवारी यशस्वीरित्या पार पडल्या असून, हिंदू-मुस्लिम एकतेचे सुरेख दर्शन यावेळी पाहायला मिळाले.दुपारी २ वाजता गावाच्या मध्यभागातून ढोल-ताशांच्या गजरात, गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या या जल्लोषात घोषणांनी गगनभेदी वातावरण निर्माण झालं. विसर्जन मिरवणूक मार्गात नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.विशेष बाब म्हणजे यातील ७ मिरवणुकांपैकी ५ मिरवणुका जामा मशिद परिसरातून पार पडल्या. या मार्गावर जाताना हिंदू-मुस्लिम समुदायातील नागरिकांनी एकमेकांना सहकार्य करत सामाजिक सलोखा आणि धार्मिक सहिष्णुतेचे उत्तम उदाहरण सादर केले.या मिरवणुकांमध्ये बाल विजय




गणेशोत्सव मंडळ कोळीपुरा, बाल गणेशोत्सव मंडळ, नवल गणेशोत्सव मंडळ, जय हनुमान बाल गणेशोत्सव मंडळ, नवयोग गणेशोत्सव मंडळ यांचा सक्रिय सहभाग होता. मंडळांचे अध्यक्ष व कार्यकर्त्यांनी शांततेत आणि शिस्तबद्धपणे विसर्जन प्रक्रियेस हातभार लावला. मिरवणुकीदरम्यान हजरत टिपू सुलतान संघटनेच्या वतीने गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांना पाणी बाटल्यांचे वाटप करून सहकार्य करण्यात आले, हे विशेष कौतुकास्पद ठरले. शहरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी खोलापुर पोलीस स्टेशनच्या ठाणेदार सुलभा राऊत यांच्या मार्गदर्शना खाली कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तहसीलदार डॉ. अजित कुमार येळे, मंडळ अधिकारी स्वाती इंदुरे, ग्राम महसूल अधिकारी एस.एस. गिल, ग्रामविकास अधिकारी कल्पना मानकर, कोतवाल वैभव चहाकार, महावितरणचे कनिष्ठ अभियंता धनविजय, प्रभारी सरपंच नाझिमुद्दीन मोहिनोद्दीन, ग्रामपंचायत सदस्य राजू पवार, सोनाली अजय आंबुलकर, जमा मशिद अध्यक्ष जुबेर खान, तैहित खान, माजी सरपंच आशुतोष देशमुख, राजू कुरे, दिनेश फिसके, सलमान भाई यांच्यासह मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते. गणेशोत्सवाचे हे विसर्जन केवळ धार्मिक विधी नव्हते, तर सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवणारे एक प्रेरणादायी उदाहरण ठरले. नागरिकांच्या शिस्त, सहकार्य व प्रशासनाच्या नियोजनामुळे संपूर्ण मिरवणूक शांततेत पार पडली.

# हैदराबाद गॅझेटचा जरांगे पाटलांना काहीच अभ्यास नाही- डॉ. संजय लाखे पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मुंबई**

मनोज जरांगे यांच्या मुंबईत केलेल्या आंदोलनाला यश आले आणि सरकारने त्यांच्या मागण्या मान्य करत जीआर काढले. मराठा आरक्षण आंदोलनाकडे लक्ष असलेल्या मराठा बांधवांनी विजयाचा गुलाल उधळला. सरकारने काढलेले जीआर मान्य करत जरांगे यांनी आपले बेमुदत उपोषण मागे घेतले. यानंतर राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला आहे. ओबीसी नेते आक्रमक झाले असून, जीआर विरोधात न्यायालयात जाण्याचा तसेच मोर्चे काढण्याचा इशारा दिला आहे. यातच मनोज जरांगे पाटील



यांच्यावर टीका करण्यात आली आहे.

राज्यभरात मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचे कौतुक केले जात आहे. मनोज जरांगे पाटलांचा फॉर्म्युला 'हिट' झाला असून, काही नेते विविध मागण्यांसाठी मराठा आंदोलनाप्रमाणे आंदोलन करण्याच्या पावित्र्यात आहेत. यातच मराठा समन्वयक आणि अभ्यासक डॉ. संजय लाखे पाटील यांनी मनोज जरांगे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

मनोज जरांगे पाटील स्वतःचे मत वाढवण्यासाठीच आंदोलन करतात. मराठा आरक्षणाचा हा जगन्नाथाचा रथ आहे. मनोज जरांगे पाटील यांचा असा समज असा आहे की, मी हा एकटाच जगन्नाथाचा रथ ओढतो. मनोज जरांगे समस्त मराठा समाजाचे नुकसान करत आहेत. जरांगे मराठा समाजाच नाही तर कुणबी समाजाच नेतृत्व करत आहेत. जरांगेची एक ही मागणी वैध कायदेशीर, घटनात्मक आणि मराठा समाजाला आरक्षण मिळावे या पद्धतीची नाही. कायदा आणि शासन आदेश, पुराव्याचा शासन आदेश, यातला फरकच मनोज जरांगे यांना कळत नाही. हैदराबाद गॅझेटचा त्यांना अभ्यास नाही, या शब्दांत डॉ. संजय लाखे पाटील यांनी हल्लाबोल केला.

दरम्यान, मराठा समाजाने मनोज जरांगेंवर केवळ फुलांवर १०० कोटी रुपये उधळले. मनोज जरांगे आंदोलनातून स्वतःची बुवाबाजी चालवत आहेत. त्यांना स्वतःच्या पुढून कॅमेरा जायला नको असे वाटते. चुकीच्या पद्धतीने आंदोलन चालवून ते मराठा समाजाचे नुकसान करत आहेत. मुंबईतील आंदोलनादरम्यान शासनाने दिलेला ड्राफ्ट मनोज जरांगे यांना अगोदरच माहीत होता. केवळ ड्राफ्ट वाचून सरकारचा जयजयकार करून गुलाल उधळला गेला. मराठा समाजाला इतर समाजापासून वेगळे पाडण्याचा अजेंडा ते राबवत आहेत, असा निशाणा साधण्यात आला.

# ईद मिलादुन्नबी निमित्त आर्वीत काँग्रेसतर्फे शुभेच्छा समारोहाचे आयोजन

## जो अच्छा इन्सान नही वोह सच्चा मुसलमान नही: शैलेश अग्रवाल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८आर्वी**

आर्वीत काँग्रेस पक्षातर्फे ईद मिलादुन्नबी निमित्त मुस्लिम बांधवांच्या स्वागताचा शुभेच्छा समारोह आयोजित करण्यात आला. या आयोजनाच्या माध्यमातून आर्वी विधानसभा क्षेत्रातील काँग्रेस नेते सोमराज तेलखेडे, तालुका अध्यक्ष सचिन दहाट, शहर अध्यक्ष महेन्द्र मात्रे व जिल्हा महासचिव रवींद्र खंडारे यांच्याकडून शुभेच्छा संदेश देण्यात आले. काँग्रेसचे राष्ट्रीय समन्वयक व प्रदेश कार्यकारी समितीचे शैलेश अग्रवाल यांनी मुस्लीम बांधवांना इस्लामिक आचरण पद्धतीनुसार या पर्वाच्या शुभेच्छा दिल्या.

ते संबोधनातून माहिती देत म्हणाले की, मुस्लिम मान्यतेनुसार मुहम्मद पैगंबर यांचा जन्म आणि मृत्यु दोन्ही याच दिवशी येतात. पैगंबरांचा जन्म मक्का येथे झाला होता व मान्यतेनुसार त्यांचे निधनही याच दिवशी झाले. म्हणून, याला बरा वफत म्हणतात – 'बरा' म्हणजे तारीख आणि 'वफत' म्हणजे मृत्यु. ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या दिवशी, मुस्लिम समाजाच्या लोकांकडून मुहम्मद पैगंबर यांच्या शिकवणी आणि आदर्शांचे स्मरण आणि त्यांचे पालन करण्याची प्रतिज्ञा करण्यात येते. या दिवशी मशिदींमध्ये विशेष नमाज पठण केले जाते, कुराण पठण केले जाते आणि दुरुद शरीफ पाठवले जाते. या दिवशी मोठ्या प्रमाणात मिरवणुका काढल्या जातात, ज्यामध्ये मुस्लिम पैगंबरांचे जीवन आणि त्यांचा एकता आणि प्रेमाचा संदेश देखाव्यांच्या माध्यमातून दाखविण्याचा प्रयत्न करतात. मोहम्मद पैगंबरांच्या शिकवणीनुसार जो दान धर्म करतो, दया भाव मनी बाळगतो, कुठल्याही अपेक्षेशिवाय दुसऱ्यांची मदत करतो, जकात देतो, कुणालाही त्रास देत नाही तो मुसलमान आहे. जो अमानत मध्ये खयानत आणतो, दुसऱ्यांना त्रास देतो, दुसऱ्यांचा हक्क बळकावण्याचा प्रयत्न करतो व खोटं बोलतो तो अच्छा इन्सान नाही आणि मोहम्मद पैगंबरांच्या दृष्टीने जो अच्छा इन्सान नही वो सच्चा मुसलमान नही मोहम्मद पैगंबर या विचारांचे पाईक असल्यामुळे फक्त मुस्लीम समाजासाठी नव्हे तर संपूर्ण विश्वासाठी आदर्श असल्याचे आपण मानत असल्याचे मत यावेळी शैलेश अग्रवाल यांनी प्रकट केले.

शुभेच्छा संदेश देतांनी रवींद्र खंडारे यांनी सांगितले की विश्वाच्या पाठीवर मुस्लीम देशांना वगळता भारत एकटाच सर्वसमावेशक देश आहे जिथे मोहम्मद पैगंबरांच्या प्रकटदिनी राष्ट्रीय सुटी देण्यात येत असून सार्वजनिक दृष्ट्या जलसे काढून सर्वच समाजाचे लोकं मुस्लिम बांधवांना ईद मिलादुन्नबी च्या शुभेच्छा देतात आणि या माध्यमातून हा सन संपूर्ण देशात साजरा करण्यात येतो. देशातील राष्ट्रीय सणांप्रमाणेच या सनात लोकांचा सहभाग एकमेकांप्रतीचा प्रेम व आदरभाव प्रकट करतो. मुस्लीम देशांना वगळता या सणाला हे स्वरूप फक्त भारतातच पाहायला मिळते. शुभेच्छा संदेश देतांनी सचिन दहाट म्हणाले की ईद-ए-मिलाद-उन-नबी ला मौलिद किंवा १२ वफत देखील म्हणतात. हा सण रबी-उल-अव्वलच्या १२ व्या तारखेला साजरा केला जातो, जो इस्लामिक कॅलेंडरचा तिसरा महिना आहे, जो पैगंबर मोहम्मद साहेबांचा वाढदिवस म्हणून प्रसिद्ध आहे. म्हणून ईद-ए-मिलाद-उन-नबीचे मोठे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे.

महेन्द्र मात्रे यांनी सांगितले की, पैगंबर मोहम्मद साहेबांचा जन्म आणि त्यांच्या जीवनातील महान कामगिरीचे स्मरण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी, मुस्लिम त्यांचे आदर्श आणि शिकवण स्वीकारण्याची आणि त्यांच्या जीवनातील उदाहरणापासून प्रेरणा घेण्याची प्रतिज्ञा करतात. इस्लामिक इतिहासात, हा दिवस प्रेम, एकता आणि आध्यात्मिक जागरूकतेचे प्रतीक मानला जातो, जो जगभरातील मुस्लिमांना एकत्र करतो. सोमराज तेलखेडे यांनी शुभेच्छापर संदेशातून सांगितले की, मुस्लिम हा दिवस आनंदाने आणि श्रद्धेने साजरा करतात, कारण या दिवशी पैगंबर मुहम्मद यांचा जन्म झाला होता आणि त्यांच्या पैगंबरत्वाची सुरुवात देखील याच दिवशी मानली जाते. पर्शियन भाषेत मिलाद म्हणजे जन्म. म्हणून, ईद-ए-मिलाद-उन-नबी म्हणजे पैगंबरांच्या वाढदिवसाचा उत्सव, जो जगभरातील मुस्लिम मोठ्या श्रद्धेने आणि भक्तीने साजरा करतात.या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विजय गहलोत, रुपेश लांडगे, सागर वाघमारे, प्यारू अली, बब्बू अली, लकी छान्गानी, पांडुरंग मलिये, कैलाश काळपांडे, वसंत मंडवे, शैलेश तलवारे, शेख नईम, शेख बब्बू, निलेश मात्रे, राहुल काळे, शेख महेमूद, शेख इस्माईल, मुझफ्फर सौदागर व इतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# बाप्पा समोरील मोदकाची तब्बल १ लाख ८५ हजारांची बोली

## अंबरनाथमध्ये मोदकांचा लिलाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अंबरनाथ**



दहा दिवस गणेशोत्सव साजरा झाल्यानंतर काल लाडक्या गणरायाला निरोप देण्यात आला. या दरम्यान अंबरनाथमध्ये गणपती बाप्पासमोर ठेवलेल्या मोदकाची लिलाव प्रक्रिया पार पाडण्यात आली. या मोदकांचा तब्बल १ लाख ८५ हजार रुपयांना लिलाव करण्यात आला. अंबरनाथ पश्चिमेच्या खाटूश्याम मित्र मंडळाने आपली अनेक वर्षांची परंपरा कायम ठेवत हा लिलाव केला.

दहा दिवस चाललेल्या गणेशोत्सवाची काल म्हणजे अनंत चतुर्दशीला सांगता झाली. लाडक्या गणरायाची मनोभावे पूजा केल्यानंतर विसर्जन करण्यात आले. सार्वजनिक गणेश मंडळांकडून काही परंपरा जपल्या आहेत. यात अंबरनाथमधील खाटूश्याम मित्र मंडळाकडून बुवापाडा परिसरात सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जात असून यंदा मंडळाचे ३३ वे वर्ष आहे. मंडळाकडून वेगवेगळे उपक्रम राबविण्यासोबत मोदकांचा लिलाव करण्याची परंपरा सुरु केली आहे.

या मंडळाकडून दरवर्षी अनंत चतुर्दशीच्या दोन दिवस आधी एक मोठा मोदक गणपती बाप्पा जवळ ठेवला जातो. या मोदकाचा अनंत चतुर्दशीला लिलाव केला जातो. हा मोदक जो भाविक विकत घेतो, त्याची भरभराट होते, अशी इथल्या स्थानिकांची श्रद्धा आहे. यातून भाविक मोठ्या संख्येने मोदक खरेदीसाठी गर्दी करत असतात. त्यामुळेच अगदी पैसे नसले, तरी लोक जुळवाजुळव करून या मोदकासाठी बोली लावतात.

यावर्षी अनामिका त्रिपाठी यांनी हा मोदक लिलावात विकत घेतला. तब्बल १ लाख ८५ हजार रुपयांची सर्वोच्च बोली लावत विकत घेतलेला हा मोदक त्यांनी त्यांचे वडील प्रमोदकुमार चौबे यांना भेट दिला. तर हा मोदक विकत घेणाऱ्यांवर बाप्पाची वर्षभर कृपादृष्टी राहते, असा विश्वास यावेळी खाटूश्याम मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रमोदकुमार चौबे यांनी व्यक्त केला.

# मराठा आरक्षण देताना ओबीसींना कोणताही धक्का नाही

## तुम्ही मागत रहा, आम्ही शक्य तेवढे देत राहू; देवेंद्र फडणवीसांचे आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८पुणे**

पुण्यातील पुरंदर तालुक्यातील भिवडी येथे आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची २३४ वी शासकीय जयंती सोहळा कार्यक्रम पार पडला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना फडणवीस म्हणाले, मराठा आरक्षण देताना आम्ही ओबीसींना कोणताही धक्का लावला नाही, मराठ्यांना सरसकट प्रमाणपत्र न देता ज्यांची कुणबी नोंद सापडली आहे त्यांनाच फक्त आरक्षणाचा लाभ मिळणार असल्याचे फडणवीस म्हणाले. तसेच ओबीसी समाजाच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध असून त्यांनी मागत राहावे, आम्ही शक्य तेवढे देत राहू, असे आश्वासन देखील त्यांनी दिले आहे.



### इंग्रजांनी जे केले ते आम्ही करणार नाही


देवेंद्र फडणवीस म्हणाले, मराठा समाज आरक्षणापासून वंचित राहणार नाही, ओबीसींच्या ताटातील काढून घेऊन सरसकट प्रमाणपत्र देणार नाही. काहीही झाले तर ओबीसींचे नुकसान होऊ देणार नाही. ओबीसींकरता योजना करणारे हे सरकार आहे. आमचे सरकारची नीती पक्की आहे. एकाचे काढून दुसऱ्याला द्यायचे नाही. इंग्रजांनी जे केले ते आम्ही करणार नाही. मराठा आरक्षण देताना ओबीसींना धक्का लागणार नाही. मराठवाड्यात १९४८ पर्यंत इंग्रज राज्य नव्हते, तर निजाम राज्य होते. मराठवाड्याचे रेकॉर्ड हैदराबाद गॅझेटमध्ये होते. आता ज्यांच्याकडे नोंद असेल त्याला प्रमाणपत्र दिले जाईल.

# छगन भुजबळ यांना जीआर ची माहिती नव्हती का?

## मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून रोहित पवारांचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ पुणे**

मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणासंदर्भातील मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या असून यामुळे राज्यातील ओबीसी समाज नाराज असल्याचे बोलले जात आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी आपली नाराजी उघडपणे बोलूनही दाखवली आहे. तसेच ओबीसी आरक्षण नेते लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांच्यासह पवार कुटुंबावर देखील हल्लाबोल सुरू केला आहे. आता यावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे.



रोहित पवार म्हणाले, मराठा समाजाचे आंदोलन होणार हे सरकारला तीन महिने आधी माहीत होते. होम डिपार्टमेंटला किती लोक येणार याचा अंदाज होता. आझाद मैदानापर्यंत आंदोलन पोहोचले हे चांगली गोष्ट आहे. आंदोलकांना काही सुविधा मिळाल्या नाहीत हे दुर्दैव आहे. आंदोलन हाताबाहेर गेले हे त्याचेच कारण आहे. कोर्टाने यात लक्ष घातले आणि त्यानंतर समितीने चर्चा करायला सुरुवात केली. लोक येणार होते तर आधीच का तयारी केली नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले, मुंबईकरांना अडचण होईल आणि त्यावर प्रश्न उपस्थित होऊन मुंबई महापालिकेत भाजपला फायदा होईल असे वातावरण तयार केले गेले. गिरीश महाजन हे समितीत होते, ते ओबीसी नेते आहेत. सर्वांना मान्य असणारा जीआर काढला तर हा ओबीसींचा वाद का? सरकारमध्ये एक मत नाही का? छगन भुजबळ यांना माहिती नव्हती का? लोकसभेच्या आधी हा निर्णय का नाही घेतला? अशी प्रश्नांची सरबत्तीच रोहित पवारांनी केली आहे.

# देवेंद्र फडणवीस हे हिमालयासारखे नेते:राजकारणासाठी त्यांनी कधी समाजाचा वापर नाही केला- मंत्री शिवेंद्रराजे भोसले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८पुणे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वंचितांचे ओबीसींचे नेते नाही तर मराठ्यांचे पण नेते आहेत. त्यांनी ओबीसी विरोधी भूमिका घेतली नाही. कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता त्यांनी आरक्षण दिले आहे, असे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी म्हटले आहे. तसेच देवेंद्र फडणवीस हे हिमालयासारखे नेते आहेत, राजकारणासाठी त्यांनी समाजाचा वापर केला नाही, त्यामुळे आरक्षणासाठी कोण बोलत असेल त्याकडे दुर्लक्ष करा, असे भोसले यांनी म्हटले आहे. क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त सोहळ्यात बोलताना शिवेंद्रराजे भोसले यांनी देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले.



शिवेंद्रराजे भोसले म्हणाले, राजे उमाजी नाईक यांची शासकीय जयंती व्हावी अशी मागणी होत होती. समाजाला दाबून ठेवण्याचे काम केले गेलं. समजून घेणारा नेता आला आणि जयंती आता साजरी होत आहे. देशात ज्यांनी अनेक वर्ष राज्य चालवले त्यांना जे जमले नाही ते मोदी यांनी केले. दिल्लीत शिवाजी महाराज आणि बाबासाहेब आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण यांचे पुतळे मोदी पंतप्रधान झाल्यावर बांधले गेले. उमाजी नाईक यांची जयंती देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केली. ओबीसी मुलांचा विकास देशात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र आहे म्हणून झाला आहे. त्यांनी सांगितले की, फडणवीस यांना प्रश्नांची जाण आहे म्हणून थोपटे यांच्या कारखान्यांना ४२० कोटी रुपये कर्ज दिले.

पुढे बोलताना शिवेंद्रराजे भोसले म्हणाले, राजकीय पोळी भाजण्याचे काम करणाऱ्या लोकांनी ओबीसी आणि मराठा लोकांचा वापर केला. यात काँग्रेस, राष्ट्रवादी आणि इतर पक्षांनी हे काम केले. मला मंत्री केले. आता माझ्या विभागाच्या वतीने इथे काम करता आले. त्याबद्दल बरे वाटले. स्मारक लवकरच होईल. रामोशी समाज आणि छत्रपती यांचे काही तरी काम करण्याची संधी मिळाली. आपण आपल्या माणसाला मोठे केले पाहिजे, असे भोसले म्हणाले.

# नागपूरमध्ये १३० वर्ष जुनी भिंत कोसळली ३ कार दबल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नागपूर**

शहरातल्या एम्प्रेस मिल परिसरातील मारवाडी चाळीत आज सकाळी मोठी दुर्घटना टळली. तब्बल १३० वर्ष जुनी मोडकळीस आलेली भिंत अचानक कोसळली. या भीषण दुर्घटनेत परिसरात उभ्या असलेल्या ३ कार भिंतीखाली दबल्या. भिंत पडत असताना येथून दुचाकी जात होती. परंतु दैव बलवत्तर म्हणून दुचाकीस्वार बचावला.

नागपुरातील एम्प्रेस मिल परिसरातील घटनास्थळी भिंत कोसळताना एवढा मोठा आवाज झाला की, परिसरातील नागरिकांची धावपळ उडाली. क्षणभर गोंधळ उडाला, धूळ-धूर भरला आणि लोकांनी जीव वाचवण्यासाठी पळापळ केली. कार मालकांनी घटनास्थळी धाव घेतली

असता त्यांच्या वाहनांचे अक्षरशः लोखंडी कचऱ्यात रूपांतर झालेले दिसले. त्यामुळे त्यांना मानसिक धक्का बसला. मात्र मनुष्यहानी टळल्याने सर्व उपस्थितांनी मात्र सुटकेचा श्वास सोडला. दरम्यान भिंत पडत असतांनाच येथून दुचाकी जात होती. ती भिंतीपुढे जाताच भिंत कोलमडून पडली. त्यामुळे दुचाकी स्वार बचावला.

# बाजारगाव सोलर एक्स्प्लोझिव्ह स्फोटात दुसरा बळी

## आयसीयूत उपचार घेणाऱ्या निकेश इरपाचीचा मृत्यू; १८ जण अजूनही रुग्णालयात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नागपूर बाजारगाव**

संरक्षण क्षेत्राला स्फोटके आणि शस्त्रात्रे पुरविणाऱ्या तसेच सुमारे ३० देशांना निर्यात करणाऱ्या सोलर ग्रुपच्या बाजारगाव येथील इकॉनॉमिक एक्सप्लोजिव्ह लिमिटेड या आयुध निर्माणीत बुधवारी मध्यरात्री १२.३४ वाजताच्या सुमारास झालेल्या स्फोटात मयूर गणवीर (वय २५) ठार झाला होता. दरम्यान शनिवारी नागपुरातील दंदे हॉस्पिटलमध्ये आयसीयूत उपचार घेत असलेल्या चार कामगारांपैकी निकेश इरपाची याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. दरम्यान कंपनी सध्या बंद ठेवण्यात आली असून कंपनी व्यवस्थापनातर्फे मृतक कामगारांच्या कुटुंबीयांना कोणतीही मदत जाहीर करण्यात आली नसल्याचे समजते.



जखमींमध्ये हिमांशु पंचभाई, सिद्धार्थ डोंगाने, प्रभात जयश्रा, सचिन सरोदे, रविंद्र मिश्रा, योगेंद्र सिंग, सन्नी कुमार, सुरेश डोसेवार, अरूण कुमार, सुरज बिटने, बादल माणिकपुरे, प्रतिक तिवारी, निरजकुमार सातरघाडगे, आशिष तुमडाम, प्रेम सिंग, देवानंद रेवतकर, चंद्रेश भारती, रोहित चांगदेकर, निकेश इरपाची आदींचा समावेश आहे. त्यांच्यावर नागपुरातील रविनगर चौकातील दंदे हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले. यापैकी सुरज कुमार, निकेश इरपाची, प्रभात जयश्रा व योगेंद्र सिंग हे आयसीयूत असून दोघे अत्यवस्थ असल्याने डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली असल्याची माहिती दंदे हॉस्पिटलने दिली आहे.

स्फोटाआधी फायर झाल्याने कामगारांना प्लांटच्या बाहेर पडण्यास वेळ मिळाला. हा स्फोट इतका भीषण होता की बाजारगावसह शिवा, सावंगासह नजीकच्या १० गावांना हादरे बसले. स्फोटाच्या आवाजाने भीतीमुळे हजारो नागरिक घराबाहेर पडले होते. कंपनीची लाखो रूपयांची उपकरणे आणि साहित्य जळून खाक झाले आहे. स्फोट झाला त्यावेळी रात्री ११ नंतरच्या शिफ्टमधील कामगार वेगवेगळ्या यूनिटमध्ये काम करीत होते. हे सर्व कामगार स्फोट झालेल्या इमारतीच्या २०० मीटर परिसरात असलेल्या प्रयोगशाळेत काम करीत होते.

# रेल्वेची दिवाळी गिफ्ट! मुंबई, पुण्यासाठी धावणार उत्सवी विशेष गाड्या

## सर्व गाड्यांचा बडनेरा येथे थांबा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

प्रवाशांच्या सोयीसाठी येत्या पूजा, दिवाळी आणि छठ उत्सव हंगामात मध्य रेल्वेने विविध ठिकाणांवरून विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला. यामध्ये नागपूर - पुणे आणि लोकमान्य टिळक टर्मिनस ते नागपूरच्या दरम्यान विशेष गाड्या सोडण्यात येणार आहेत. नागपूर - पुणे - नागपूर साप्ताहिक विशेष गाडीच्या २० सेवा होणार आहेत. ०१२०९ विशेष सेवा २७ सप्टेंबर ते २९ नोव्हेंबरपर्यंत प्रत्येक शनिवारी नागपूर येथून १९.४० वाजता सुटेल आणि पुणे येथे दुसऱ्या दिवशी ११.२५ वाजता पोहोचेल.

या गाडीच्या १० सेवा होतील. ०१२१० रेल्वे गाडीच्या विशेष सेवा २८ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत प्रत्येक रविवारी पुणे येथून १५.५० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ०६.३० वाजता पोहोचेल. या गाडीच्या देखील १० सेवा होतील. उरुळी, दौंड कॉर्ड लाईन, अहमदनगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा येथे गाडीला थांबा राहणार आहे.



चार वातानुकूलित ३-टियर, सहा शयनयान, सहा सामान्य द्वितीय, दोन सामान्य द्वितीय आसन व्यवस्थेसह गार्ड ब्रेक व्हॅन, अशी गाडीची संरचना राहील.

लोकमान्य टिळक टर्मिनस - नागपूर - लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक सुपरफास्ट विशेष गाडीच्या २० सेवा होणार आहेत. ०२१३९ साप्ताहिक सुपरफास्ट विशेष २५ सप्टेंबर ते २७ नोव्हेंबरपर्यंत प्रत्येक गुरुवारी लोकमान्य टिळक टर्मिनस (मुंबई) येथून ००.२५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १५.३० वाजता पोहोचेल. गाडीच्या १० सेवा होतील. ०२१४० साप्ताहिक सुपरफास्ट विशेष २६ सप्टेंबर ते २८ नोव्हेंबरपर्यंत प्रत्येक शुक्रवारी नागपूर येथून १३.३० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस (मुंबई) येथे दुसऱ्या दिवशी ०४.१० वाजता पोहोचेल. या गाडीच्या देखील १० सेवा होणार आहेत.


या गाडीला ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा येथे थांबा आहे. तीन वातानुकूलित तृतीय, १० शयनयान, ५ सामान्य द्वितीय, २ सामान्य द्वितीय आसन व्यवस्थेसह गार्ड ब्रेक व्हॅन अशी गाडीची संरचना राहील. पुणे-नागपूर विशेष गाडीचे आरक्षण विशेष शुल्कासह ०८ सप्टेंबरपासून, तर लोकमान्य टिळक टर्मिनस-नागपूर विशेष गाड्यांचे आरक्षण ०९ सप्टेंबरपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच संकेतस्थळावर सुरू होईल.

# गणेश विसर्जन मिरवणुकीत वाहन पलटी

## १०-१२ जण जखमी; मूर्तीचे तलावात विसर्जन; कोणतीही जीवितहानी नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मार्डी**

पोलीस स्टेशन कुऱ्हा हद्दीतील ग्राम मार्डी येथे आज, दि. ८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी सुमारास गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान मोठा अपघात टळला. छाया कॉलनी, पार्वती नगर, पोस्टे खोलापुरी गेट येथील गणेश मंडळाचे वाहन (क्र. MH 29 BC 2134) हे गोरखनाथ महाराज मंदिराजवळ वर्धा नदीकडे जात असताना अचानक पलटी झाले.



या वाहनात बसलेले सुमारे १० ते १२ गणेशभक्त जखमी झाले असून त्यांना तात्काळ मार्डी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार दिल्यानंतर पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे पाठवण्यात आले आहे.

सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसून, गणेशमूर्तीचे विसर्जन पुढे मार्डी येथील तलावात शांततेत करण्यात आले.


स्थानिक प्रशासन व पोलिसांनी तत्परतेने मदतकार्य करत मिरवणुकीची व्यवस्था सुरळीत राखली.

# विभागीय लोकशाही दिनात १२ प्रकरणांवर सुनावणी

## प्रलंबित प्रकरणांचा आगामी लोकशाही दिनापूर्वी निपटारा करावा - विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

विभागीय लोकशाही दिनात दाखल होणाऱ्या प्रकरणांवर विहीत कालमर्यादेत कार्यवाही करुन जलदगतीने निपटारा करण्यात यावा. मागील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनी येवू नये, पुढच्या लोकशाही दिनाच्या अगोदरच शेवटचे निराकरण करुन प्रकरण नस्तीबध्द करण्यात यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी संबंधित विभागप्रमुखांना आज दिले. लोकशाही दिनात दाखल एकूण १२ प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.



विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात श्रीमती सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज आज पार पडले. अपर आयुक्त अजय लहाने, सह आयुक्त के. पाणबुडे, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी तसेच पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून यावेळी बैठकीला उपस्थित होते.

यावेळी विभागीय लोकशाही दिनात दाखल एकूण १२ प्रकरणांवर चर्चा करण्यात आली असून तीन प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर उर्वरित प्रकरणांवर पंधरा दिवसांत आवश्यक कार्यवाही करुन अंतीम अहवाल सादर करण्याच्या सूचना श्रीमती सिंघल यांनी संबंधित विभागप्रमुखांना केल्या.

विभागीय लोकशाही दिनासाठी सामान्य प्रशासन विभागाव्दारे ३ स्वीकृत अर्ज, ६ अस्वीकृत अर्ज (सामान्य तक्रारी) तसेच वेळेवर दाखल ३ अर्ज, असे एकूण १२ प्रकरणांवर लोकशाही दिनात चर्चा करण्यात आली. ही प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यासाठी संबंधित विभागांनी स्थळ पाहणी, मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावेत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले. विभागीय महिला लोकशाही दिनांतर्गत एकही प्रकरण दाखल झाले नाही, अशी माहिती महिला व बाल विकास विभागाकडून सादर करण्यात आली.

यावेळी लोकशाही दिनासाठी अमरावती विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. मागील लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये.

# भूमिगत जहाल नक्षलवाद्याला अटक, गडचिरोली पोलिसांची थेट हैदराबादमध्ये कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८गडचिरोली**

खून, चकमक, जाळपोळ अशा गंभीर गुन्ह्यांत आरोपी असलेल्या जहाल नक्षलवाद्याला गडचिरोली पोलिसांच्या विशेष पथकाने तेलंगणातील हैदराबाद शहरातून अटक केली. शंकर ऊर्फ अरुण येर्रा मिच्चा (२५ रा. बांदेपारा, ता. भोपालपट्नम, जि. बीजापूर, छत्तीसगड) असे अटक करण्यात आलेल्या जहाल नक्षलवाद्याचे नाव असून तो भूमिगत होण्यापूर्वी पेरमीली दलमचा सक्रिय सदस्य होता. त्याच्यावर दोन लाखांचे बक्षीस होते.



छत्तीसगडचा रहिवासी असलेला शंकर उर्फ अरुण २०१८ साली मद्देड दलममध्ये भरती झाला होता. २०२२ नंतर तो गडचिरोली जिल्ह्यात सक्रिय झाला. २०२४ पर्यंत तो पेरमीली दलमध्ये कार्यरत होता. २०२३ रोजी कापेवंचा येथे रामजी आत्राम यांची त्याने हत्या केली. दरम्यानच्या काळात गडचिरोली पोलिसांनी नक्षलविरोधी मोहीम अधिक तीव्र केल्याने घाबरलेल्या शंकरने भूमिगत राहून काही काळ शेती केली व त्यानंतर तो तेलंगणातील हैदराबाद येथे कामगार म्हणून राहू लागला.

यासंदर्भात मिळालेल्या गोपनीय माहितीवरून पोलीस अधीक्षक निलोत्पल यांच्या मार्गदर्शनात 'सी-६०' पथकाच्या जवानांनी सापळा रचून ४ सप्टेंबरला हैदराबाद येथून शंकरला ताब्यात घेतले. यावेळी चौकशीदरम्यान त्याने हत्येची कबुली दिली. यावरून पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करीत त्याला न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

# रेल्वेपूल बंद - 'विदर्भाचा राजा' मिरवणुकीसाठी मार्गात बदल

## शिस्तीत आणि मस्तीत निघणार 'राजाची' विसर्जन मिरवणूक, लेझीम पथक,वारकरी दिंड्याचा राहणार सहभाग



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

रेल्वेपूल बंद असल्यामुळे न्यू आझाद गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी तातळीची बैठक घेऊन विदर्भाचा राजाच्या विसर्जन मिरवणुकीचा मार्गात बदल केला असून पोलीस विभागाला याबाबत माहिती दिली आहे.

दरवर्षी इर्विन चौकात न्यू आझाद गणेशोत्सव मंडळातर्फे विदर्भाचा राजाची मोठ्या धुमधडाक्यात थापना केली जाते आणि त्याच माणे विसर्जन मिरवणुक काढली जाते. दुपारी ३ वाजतापासून काढलेली विसर्जन मिरवणूक रात्री १ पर्यंत चालते. यावेळी शहरातील हजारो नागरिक मिरवणुकीमध्ये सहभागी होतात परंतु रेल्वे पुलाची स्थिती वाहतुकीसाठी धोकादायक असल्यामुळे रेल्वे पुलावरून गणेश विसर्जन मिरवणुक काढणे नागरिकांच्या जिवीताच्या दृष्टीने सुरक्षीत नाही, असा अहवाल पोलीस विभागाला प्राप्त झालेला आहे.

त्यामुळे न्यू आझाद गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी तात्काळ बैठक घेऊन ११ सप्टेंबर रोजी काढण्यात येणाऱ्या विसर्जन मार्गात बदल केला आहे. न्यू आझाद गणेश मंडळ येथून विसर्जन मिरवणुकीला सुरुवात होता. त्यानंतर इर्विन चौक ते मालविय चौक, जयस्तंभ चौक, श्याम चौक आणि राजकमल चौकात मिरवणूक जाणार. तसेच राजकल चौकातून परत श्याम चौक, जयस्तंभचौक, मालविय चौक, दिपक चौक, आदर्श हॉटेल आणि मोसिकॉल येथील विसर्जनस्थळी मिरवणूक जाणार आहे, अशी माहिती वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षण प्रविण वांगे यांनी दिली आहे.

# उद्याला जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा

## अमरावती जिल्हा परिषदच्या शिक्षकांचा होणार सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

अमरावती जिल्हा परिषदेतर्फे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण ९ सप्टेंबरला केले जाणार आहे. त्यासाठी गर्ल्स हायस्कूल येथे प्राथमिक शिक्षणाधिकारी सतीश मुघल यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेऊन विविध समित्यांचे गठण करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या शिक्षकांचा गौरव दरवर्षी जिल्हा परिषदेतर्फे दरवर्षी करण्यात येतो. यावर्षी हा कार्यक्रम मंगळवारी (ता. नऊ) जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील जिल्हा नियोजन भवन येथे होत आहे.

या कार्यक्रमाला मुख्यअतिथी विभागीय



आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन अधिकारी संजीता महापात्र, विभागीय शिक्षण उपसंचालक निलीमा टाके (गुल्हाने), सर्व खाते प्रमुख, सर्व गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, शिक्षकपुरस्कार घोषित शिक्षकांचे कुंटूब, शिक्षक संघटना पदाधिकारी हे उपस्थित राहणार आहे.कार्यक्रमासाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या असून, संतोष घुगे, नितीन उंडे, प्रसाद संकपाळ, संदीप बोडखे, अनिल डाखोळे, विनोद गाढे, विकास भडांगे, रामेश्वर माळवे, रजनी शिरभाते, अजित पाटील यांच्याक जबाबदाऱ्या देण्यात आलेल्या आहेत. आहे.कार्यक्रमास उपस्थित राहण्या आवाहन प्राथमिक शिक्षणाधिक सतिश मुगल, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, शिक्षणाधिकारी (योजना) निखिन मानकर यांनी केले आहे.

# शिक्षक सहकारी बँकेची वार्षिक सभा उत्साहात; नफ्यातून सभासदांना १% लाभांश मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

शिक्षक सहकारी बँकेची वार्षिक सभा रविवार ७ सप्टेंबर रोजी शांततेत आणि उत्साहात पार पडली. या सभेत प्रथम बँकेच्या १८ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या वार्षिक साधारण सभेचा वृत्तांत वाचुन कायम करणे, तसेच नफा-तोटा व ताळेबंद पत्रक मंजूर करणे, सन २०२५-२६ वे अंदाजपत्रक मंजुर करणे यासह विविध विषयावर चर्चा करण्यात आली. महत्वाचे म्हणजे अहवाली वर्ष सन २०२४-२५ मध्ये बँकेला झालेला नफा मधुन सभासदांना ९% लाभांश मंजुर झाला आहे. या सभेला बँकेचे अध्यक्ष गोकुलदास श्रीराम राऊत यांच्यासह सर्व संचालक, पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

प्रथम बँकेच्या १८ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या वार्षिक साधारण सभेचा वृत्तांत वाचुन कायम करण्यात आला. त्यानंतर बँकेच्या ३१/०३/२०२५ चा वार्षिक अहवाल, नफा-तोटा व ताळेबंद पत्रक मंजुर करणे. बँकेच्या सन २०२४-२५ मध्ये अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास




मंजुरी देणे व सन २०२५-२६ वे अंदाजपत्रक मंजुर करणे. बँकेच्या सन २०२४-२५ च्या नफा विभागणीस मान्यता देणे. बँकेच्या सन २०२४-२५ च्या लेखापरिक्षकांच्या लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे व स्विकृत करणे. बँकेच्या सन २०२४-२५ च्या लेखापरिक्षकांचे दोष दुरुस्ती अहवालावर विचार करणे व स्विकृत करणे. बँकेच्या सन २०२५-२६ करिता वैधानिक लेखा परिक्षणासाठी बँकेच्या संचालक मंडळाने रिझर्व्ह बँकेला शिफारस केलेल्या सनदी लेखापरिक्षकाची नेमणूक करणेव सहकारी खात्याचे नियमानुसार मेहताना ठरविणे. महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम कलम नं. ७५/२ मधील तरतुदीनुसार संचालक मंडळ सदस्य व त्यांच्या सभासद कुटुंबियांना सन २०२४-२५ या सहकारी वर्षात दिलेल्या कर्जाचे विवरण वाचुन नोंद घेणे. बँकेच्या सभासदास प्रशिक्षण देणेबाबत विचारविनीमय करणे.सं.म.सभा दि. २७/०७/२०२५ ठराव क्र. ३७ अन्वये पारीत झालेल्या ठरावा नुसार बँकेच्याआदर्श सेवानियम व एच. आर. पॉलिसी मध्ये केलेल्या दुरूस्तीस मंजुरात प्रदान करण, उपविधी क्र.५/२३ मधील उपविधी दुरूस्तीबाबत विचार विनीमय करणे. संचालक मंडळ सभाश्र २५/०५/२०२५ ठराव क्र. ४३ अन्वये झालेल्या निर्णयानुसार वाशिम, अकोला, यवतमाळ शाखा करीता प्लॉट खरेदी करणे व इमारत बांधकाम करण्यास मंजुरात प्रदान करणे. मृत कल्याण निधी नियमक्र. ६,८,९,१२,१४,१७,२१,२२,२६ मध्ये केलेल्या मंजुरात प्रदान करणे. बँकेचे बुडीत व संशयीत थकीत कर्ज निर्लेखित करणेस मंजुरात प्रदान करणेबाबत विचार विनियम करण्यात आला. तसेच अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळवर येणारे विषय यावर चर्चा होऊन सभेची मंजुरात घेण्यात अहवाली वर्ष सन २०२४-२५ मध्येबँकेला झालेला नफा मधून सभासदांना ८ वरून ९% लाभांश मंजुर करण्यात आला. या सभेला - उपस्थित शिक्षक सहकारी बँकेचे गोकुलदास -ऋ श्रीराम राऊत, अध्यक्ष, मो. नाज़ीम अ. गफ्फार उपाध्यक्ष, संचालक तुळशिदास मुरलीधरराव धांडे, प्रफुल्ल विठ्ठलराव शेंडे, सुरेंद्र विनायकराव मेटे, कैलास माणीकराव कडू, उमेश उर्फ उत्तम रामदास चुनकीकर, अजयानंदसच्चिदानंदपवार, रामदासजी शेषरावजी कडू. रा.ना. उर्फ राजेंद्र नारायणराव गावंडे, मनिष रत्नाकरराव काळे, विजय प्रल्हादराव कोठाळे, संभाजी श्रीरामजी रेवाळे, राजेश विश्रामजी गाडे, सरिता दिपकराव काठोळे, संगीता शामकांतजीतडस, तंज्ञसंचालक ॲड. राजपाल काशिराम वानखडे, ॲड. मो. शकील अहमद मो. गयास हे होते.